

ाज कथा

मिवैचा गोटा

गुरुनाथ नाईक



कथा क्र. ३

फेब्रुवारी १९७१

नर्मदेचा गोटा

गुरुनाथ नाईक

[illegible]नंद प्रकाशन पुणे ३०

मूल्य दीड रुपया

दरमहा नियमितपणें प्रसिद्ध होणाऱ्या आमच्या अत्यंत लोकप्रिय अशा १) गरूडकथा, २) शिलेदारकथा, ३) गोलंदाज कथा, ४) सारंगकथा, ५) रणधीरकथा यांच्या वार्षिक वर्गणीचे दर खालीलप्रमाणें आहेत.

१)	कोणतीहि एक माला	: रु. पंधरा फक्त
२)	कोणत्याहि दोन माला	: रु. पंचवीस फक्त
३)	कोणत्याहि तीन माला	: रु. चाळीस फक्त
४)	कोणत्याहि चार माला	: रु. पन्नास फक्त
५)	सर्व पाच माला	: रु. साठ फक्त

मुद्रक : प्रकाशक

सदानंद खाडिलकर

स. म. खाडिलकर आणि कं., प्रिंटर्स,
१२८६, सदाशिव पेठ,
चिमण्या गणपतीजवळ
पुणें ३०.

§ §

फेब्रुवारी १९७१

§ §

सर्वाधिकार
लेखकाचे स्वाधीन

§ §

वार्षिक वर्गणी
पंधरा रुपये

: १ :

झाशीहून ग्वाल्हेरकडे जाण्याचा रस्ता रानाडोंगराने वेढलेला. वाटेत उंचच उंच डोंगर आणि तीनचार पुरुष खोल खड्डयानी व्यापलेला. बैलांची गाडी जाऊ लागली की अधून-मधून थांबावे लागे.

卐

बन्सीलाल भांगा हे झाशीहून ग्वाल्हेरकडे चालले होते. फार मोठे व्यापारी. त्यांच्या जमिनीतून चालायला सूर्य उजाडताच सुरुवात केली तर सूर्य मावळला तरी ती संपायची नाही इतकी मोठी. भरपूर पीक देणारी.

त्यांच्याच मुलाचे लग्न. आठ दिवस आधीपासून गावजेवणे चाललेली. शृंगारलेल्या बैलगाड्या आणि घोडागाड्या त्या रस्त्याने चाललेल्या. रस्ता घातकी आणि भयाण. साहजिकच दहा हत्यारबंद गडी घोड्यांवरून मागे-पुढे होतेच.

बन्सीलालना कसलीही चिंता नव्हती. समारंभाने आणि सनईच्या सुरानी त्यांचे कान भारून गेले होते. मनही सुन्न झाले होते. कसलातरी विचार करण्याच्या पलिकडे त्यांचे मन गेले होते.

हो. भरपूर संपत्ती असते त्याची हावही तेवढीच मोठी असते म्हणतात. त्यांचा मुलगा म्हणजे लाखाची हुंडी. रोख चाळीस हजार रुपये. पन्नास डौलदार घोडे. शिवाय मुलीच्या अंगावर हिरेमोत्यांचे दागिने. तब्येत खूष झाली होती त्यांची.

त्यांच्या डोळयांपुढे उभी होती ती पैशांची... चाळीस हजारांची थैली आणि नटून थटून घराचा उंबरा ओलांडणारी आपली सून.

सूर्य मावळतीकडे जायला लागून बराच उशीर झाला होता. थोडयाच अवकाशात सूर्य मावळेल आणि मुक्कामाला पोचायला मध्यरात्रही उलटून जाईल असे वाटत होते. काही जणाना चिंता होती ती हीच.

शेवटी एकाने टूम काढली. नात्यातला वृद्ध माणूस तो. ऐकल्याशिवाय गत्यंतर नव्हते. मोकळे मैदान पाहून रानातच मुक्काम ठोकायचा. इतकी माणसे आहेत. शिवाय, हत्यारबंद शिपाईही आहेत. चोराचिलटांची किंवा दरोडेखोरांची पुढे यायची हिम्मत काय ?

मुक्काम ठोकला. एका बाजूला गर्द झाडीने झाकला गेलेला उंचच उंच पर्वत. दुसऱ्या बाजूला तेवढा उंच नसला तरी दलदल आणि झाडाझुडपानी दडलेला भाग. मधून जाणारा तो रस्ता. शिवाय या दोन्ही भागाना स्पर्श करून जाणारी विशाल पात्राची ती नदी.

भल्या मोठ्या गवताळ मैदानात त्यांचा तंबू पडला. उघडयावर मुक्काम ठोकण्यात आला. भली मोठी चूल ठेवण्यात आली आणि स्वयंपाकाची भव्य तयारी सुरू झाली. काळोख पडल्यानंतर पंचाईत होऊ नये म्हणून मशालीही तयारीत ठेवण्यात आल्या.

पण त्यावेळी त्यांचे पहारेकरी मात्र मोर्चे लावून बसले होते. काही गड-बड झालीच तर तोंड देण्यासाठी दहाही हत्यारबंद शिपाई जय्यत तयारीत होते.

एकच गोंधळ तेथे सुरू झाला. थट्टा मस्करीला ऊत आला. लग्नाचेच वऱ्हाड ते, गोंधळ घातलाच पाहिजे. पोरेसोरे नदीकाठावर नाचू लागली.

रात्र झाली आणि सर्व एकत्र जमले. एकाने सुरुवात झालेली चल... चार चुली विझण्याच्या बेतात आल्या होत्या. भोजनाचा खमंग सुवास सर्वत्र दरवळत होता. आणि नाचून ओरडून दमलेल्याना तर वास नाकात शिर-ताच सडकून भूक लागली होती. केव्हा एकदा समोर जेवण येते असे त्याना झाले होते.

सडकून भूक लागली होती सर्वांना.

पंगती बसल्या. काही घोडेस्वारानी दौडत जाऊन एका खेड्यातून केळीची पाने आणली होती. चारशे साडेचारशे लोकांची गोलाकार पंगत भोजनात दंग झाली, आणि तेव्हाच या घटनेला सुरुवात झाली.

चूक होती बन्सीलालची.

‘ अरे, तुम्ही बसा जेवायला. ’

‘ आम्ही नंतर जेवतो मालक. ’

‘ नको. नंतर का ? अरे लग्नाची पंगत आहे. बंगल्यात काय आणि रानात काय... सर्वांनी एकत्र बसावे. काही घाबरू नका तुम्ही. बन्सीलालच्या लग्नाचे वऱ्हाड आहे हें. दरोडेखोर चुकून फिरकणार नाही इथं. ’ बन्सीलाल बोलत होते. त्याना कैफ चढला होता.

मद्याला न शिवणारे बन्सीलाल भरपूर मद्य झोकल्यासारखे दिसत होते. सर्वजणच बसले. श्लोक झाले आणि भोजनाला सुरुवात झाली.

जेवण ऐन रंगात आले आणलेले लाडू, जिलब्यांचे हंडे रिकामे होऊ लागले.

अगदी तीच वेळ काळाने साधली. तो आला तरी कसा दौडत. कुणाला काही कल्पनाच आली नाही. जेवणाऱ्या पहारेकऱ्याना आपल्या बंदुकाही उचलता आल्या नाहीत. उठून धडपडत उभे राहणारे लोक धडाधड खाली कोसळू लागले.

काय झाले हे अर्ध्यांना समजलेच नाही. बायकापोरांच्या किंकाळ्यानी आणि गोळीबाराच्या आवाजात सारे आसमंत भरून गेले.

सुमारे पंचवीस बंदुकधारी घोडेस्वारानी चौफेर हल्ला चढवला होता. काळोखात मिळेल त्या दिशेला जो तो पळत होता. अनेकानी धडाधड नदी-तही उड्या टाकल्या होत्या.

पंधरा मिनिटे हा हैदोस टिकला. बोंबाबोंब सुरू झाली. मशाली विझल्या गेल्या.

—आणि आलेले घोडेस्वार मशालीप्रमाणेच निघून गेले. ते गेले पण बन्सी-लालचे उधळलेले घोडे पाहून ते गेले. हे कुणाला समजलेच नाही.

समजले त्याना बराच उशीर झाला होता.

बऱ्याच वेळाने सर्व काही शांत झाले. लपून जीव वाचवण्यासाठी सावध' गिरी बाळगणारे आता हळुहळू जमा झाले. पलिते पेटले आणि उजेडात पाहणी सुरू झाली.

बन्सीलाल घायाळ होऊन पडले होते. नवरदेवाचे डोके फुटले होते, पण फारशी इजा झाली नव्हती. त्याच्या अंगावरचा एकूण एक दागिना ओर-बाडून काढण्यात आला होता. शिवाय, दागिन्यांची पेटीही नाहीशी झाली होती.

बन्सीलालचे सर्वस्व हिरावून नेले असे सर्वांना वाटले.

ठार झालेल्यात वृद्ध होते, मुले होती आणि स्त्रिया होत्या. कुणी वेदनानी विव्हळत होते, कुणी किंचाळत होते. मृत्यूच्या भयाने बन्सीलाल तर मेल्या-तच जमा झाले होते. काय करावे हेच मुळी कुणाला सुचेनासे झाले. अधि-कारवाणीने हुकूम सोडणारे म्हातारबोवाही आता तोंड वासून रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. त्यांच्या छातीत गोळी शिरली होती.

इतके भयंकर हत्याकांड यापूर्वी तरी कुणी कधी पाहिले नव्हते. ऐकलेही नव्हते. तेवीस माणसे ठार झाली होती. अर्ध्याच्यावर जखमी होऊन विव्हळत होती.

सर्वांच्याच तोंडचे पाणी पळाले होते. काय करावे हे कोडे प्रत्येकाला होते. लग्नाला जाणेच शक्य नव्हते.

पण त्यात काही शहाणी माणसं होती. ते दरोडेखोर पुन्हा येणार नाहीत हे त्याना पक्के माहित होते. कारण, त्यानी आपले काम केले होते.

लगेच एकाने सुचवले, घोडेस्वार पाठवावेत ग्वाल्हेरला. सर्व खबर नवरी-कडच्या लोकांच्या कानी घालावी. बराच वेळ घोळ- घातल्यानंतर चार घोडेस्वार मारून मुटकून वैद्य झाल्याप्रमाणे तयार झाले.

० ० ०

जसवंतसिंग राठी याने चंबळेच्या खोऱ्यात आपला नुकताच जम बसवला होता. लहान लहान टोळ्याना त्याने पळवून लावले होते. आणि निर्ढावलेल्या पन्नास लोकांची एक भयंकर टोळी तयार केली होती.

बन्सीलालांवर त्यांचा डोळा होता. झाशीला भर वस्तीत असलेल्या घरा-वर दरोडा घालायला तो तयार नव्हता. पण कधी ना कधीतरी संधी मिळेल

अशी त्याला खात्री होती. तिथे दरोडा घातला तर आपल्याला काही महिने तरी ददात नाही असे त्याला वाटत होते.

जसवंतसिंगच्या पाठीमागे पोलिस तुकड्या अगदी हात धुवून लागल्या होत्या. पण त्याचा अजूनही ठावठिकाणा सापडला नव्हता. त्याची भरारी पाहूनच ते चकीत होत असत. पहिला दरोडा पडल्यानंतर शंभर मैलांहूनही दूर त्याचा दुसरा दरोडा पडत असे.

ही भरारी पोलिसाना तशी नवीन होती. चक्रावून सोडणारी. अतिशय धूर्त दरोडेखोर अशी सरकारदरबारी त्याची नोंद झाली होती. मी मी म्हणणारे गोरे अधिकारी तर सपशेल माघार घेत होते.

जसवंतसिंगचे प्रत्येक शहरात हेर होते. प्रत्येक घटना ते आपल्या माल–काला सांगत. कुठे दरोडा घालायचा आणि कुठे घालू नये हे तो बराच विचार करून ठरवी.

बन्सीलालच्या लग्नाची बातमी त्याने ऐकली आणि जसवंतसिंगचे डोळे चकाकले. लग्नाच्या ऐन धामधुमीत दरोडा घालायचा त्याने बेत आखला. कारण, अशी संधी गाठली की कल्पनेहून जास्त फायदा होतो हे त्याला कुणी सांगायला नको होते.

शिवाय, धोकाही बराच कमी. लग्न म्हणजे घाईगडबड आलीच. चांगल्या पोशाखात फिरायचे. हत्यारे कशी तरी दडवून न्यायची आणि सर्व लुटून फरारी व्हायचे. बेत ठरला.

तसा डोकेबाज होता तो जसवंतसिंग !

वऱ्हाडात सामील व्हायचे. मुलीकडच्याना वाटेल हे मुलाकडचे आहेत आणि मुलाकडच्याना वाटेल हे सर्व लोक मुलीकडचे आहेत.

रात्री सर्व धमाल उडवून द्यायची.

पण लगेच त्याला दुसरी बातमी मिळाली. शेटजी वऱ्हाड घेऊन ग्वाल्हेरला जाणार आहे.

ही बातमी म्हणजे दुधात साखर होती. वऱ्हाडी मंडळी ग्वाल्हेरला जाणार. रस्ताही ठरलेला. बस्सं ! वाटेत त्यांना गाठायचे आणि ठार करा-यचे. काम तर अगदीच सोपे होते. वाटेत सरळ हल्ला चढवायचा.

तिसरी बातमी सकाळीच आली. वऱ्हाडी मंडळी निघालेली आहे. त्यांच्याबरोबर दहा हत्यारबंद शिपाई आहेत.

झाले. ही जरा चिंतेची बाब होती. जसवंतसिंग हे प्रकरण हाताबाहेरचे असले तर फाजील विश्वासाने कामगिरीवर निघत नसे. स्वत:बद्दल घमेंडही त्याच्या मनात कधी आली नव्हती. पुरेपूर विचार केल्याशिवाय एकही पाऊल तो पुढे टाकीत नसे.

हत्यारबंद दहा शिपाई. या शिवाय तरुण मंडळीही बरीच असणार. त्याना तोंड देण्याची तयारीही बरीच करावी लागणार.

लगेच त्याने आपल्या सर्व माणसाना एकत्र बोलावले. त्याचा साधा नोकर असला तरी अशा बैठकीच्यावेळी तो प्रत्येकाच्या सूचनेवर चर्चा करीत असे. इतरांना वाटे, मालक किती चांगला आहे. प्रत्येक गोष्ट तर तो आपल्याला विचारून करतो.

पण सर्वांचे ऐकून तो त्यातून स्वतःचाच निर्णय घेत असे.

वऱ्हाडी मंडळी कशी कोणत्या रस्त्याने निघाली, याची त्याने नीट माहिती करून घेतली आणि तो निघाला. चोवीस घोडेस्वार त्याच्याबरोबर होते. एकाचवेळी चौफेर हल्ला करायचा. काही झाले तरी आज बन्सीलालला सोडायचे नाही.

ते रात्री कोणत्या वेळेला कुठे पोचतील याचा जसवंतसिंगने विचार केला आणि भोवताली डोंगरात लपून बसला. आत आले की झोडायचे. वाटेत ठिकठिकाणी त्याची माणसे दडून बसली होती.

हो. काय सांगावे ! लग्नाचे वऱ्हाड ते ! वाटेतही त्यांचा एकादेवेळी मुक्काम पडायचा.

झालेही तसे. त्याला दौडत आलेल्या घोडेस्वाराने बातमी सांगितली. चार कोस मागे वऱ्हाडी मंडळी थांबली होती.

निजानीज झाली की मग हल्ला करायचा असा त्याने बेत केला. आपल्या सर्व माणसाना त्याने बऱ्याच दूर अंतरावर रहायला सांगितले होते आणि फक्त एका जोडीदाराला सोबतीला घेऊन तो डोंगराच्या उतारावर गर्द झुडुपात उभा होता.

पंगत बसायला सुरुवात झाली आणि जसवंतसिंग भानावर आला. संकल्पाची वेळ आणखी जवळ आणावी हे त्याच्या मनात आले. जेवण्याच्या ऐन रंगात हल्ला करावा. काहीही हालचाल जमायची नाही त्याना.

पण हे कसे करायचे ? जेवताना ?

त्याचे भाविक मन थोडेसे कचरले. जेवताना वार करणे त्याला तितकेसे प्रशस्त वाटले नाही. पाठीवर मारावे पण पोटावर मारू नये असे त्याचे स्पष्ट मत होते.

तरीही त्याने मनाचा निश्चय केला. ही संधी घालवली तर पुन्हा मिळायची नाही, हेही तितकेच खरे होते. काहीही होवो. हल्ला करायचा. दहा हत्यारबंद शिपाई जेवायला बसलेले त्याने पाहिले होते.

हीच नामी संधी. ही गमावली तर मग सर्वच काही अवघड जाणार होते.

तो मागे फिरला. आपल्या सर्व माणसाना त्याने सूचना दिल्या आणि एकदम चौफेर हल्ला चढवला.

हल्ला भयानक होता. चार माणसांना त्याने स्त्रियांच्या अंगावरचे दागिने खेचायचे काम दिले. दोघांनी दागिन्यांची पेटी पळवायची. इतरानी प्रतिकार मोडून काढायचा.

झुंजारहल्ला थोडक्यात आटोपला. कल्पनेहूनही अल्पकाळात. सर्वच्या सर्व घोडेस्वार पलिकडचा डोंगर उतरू लागले तेव्हा जसवंतसिंग खूष होता. भरपूर लूट त्याच्या हाती आली होती. इतके दिवस वाट पाहिली त्याचे सार्थक झाले होते.

पण त्याचवेळी जसवंतसिंगला माहित नव्हते की, एक राहु आपल्या मागे लागणार आहे. त्याला घाबरून सर्व उच्च ग्रह आपल्यावर उलटणार आहेत.

: २ :

रामप्रसाद बंग हे ग्वाल्हेरमधले फार बडे प्रस्थ. आपल्या इतका श्रीमंत माणूस पंचक्रोशीत नाही ही त्याची घमेंड. —आणि होतेहि तसेच.

卐 बंगच्या मुलीचे लग्न. खास निमंत्रणे गेलेली.

उदयसिंह चौहानला निमंत्रण घेऊन खास माणूस आलेला. नाही कसे म्हणावे ? घरातून कुणीतरी गेलेच पाहिजे. त्याच्याशिवाय दुसरा जाणार तरी कोण ?

उदयसिंह दोन दिवस आधी ग्वाल्हेरात येऊन दाखल झाला. दूरदूरच्या पाहुण्यांची नुसती रीघ लागली होती.

एक दिवस आधी...सकाळीच वऱ्हाडी मंडळी येणार अशी बातमी आली होती. जो तो रामप्रसादांचा जावई कसा असेल याचा तर्क करीत होता. कारण, तोच एक कुतुहलाचा विषय होऊन बसला होता.

याला कारण होते, यापूर्वी मी मी म्हणणाऱ्यानी त्यांच्या मुलीला मागणी घातली होती आणि त्याना रामप्रसादांकडून सरळ नकार मिळाला होता. प्रत्येकाला मागणी घालून नकार मिळाल्यानंतर रामप्रसाद किती गर्विष्ट आहे याची कल्पना आली होती.

काही दिवसांपूर्वीच एका श्रीमंत तरुणाने त्यांच्या मुलीला मागणी घातली होती. मुलगा काही वाईट नव्हता. देखणा. शिवाय श्रीमंत.

पण रामप्रसादानी नीट ऐकून घेऊन म्हटले होते, ' मला जावई हवा माझ्या मांडीला मांडी लावून बसण्याच्या लायकीचा. पायाकडे बसणारा नको.'

तोंडावर चपराक बसावी तसा तो तरूण काही न बोलता निघून गेला होता, आणि आता हीच चर्चा सर्व गावात चालू होती.

काही झाले तरी रामप्रसादांचा जावई अतिशय देखणा आणि श्रीमंत असणार याची सर्वांना खात्री होती. कारण ते अतिशय चोखंदळ होते. श्रीमंत असतील ते एवढ्याचसाठी की, भरपूर हुंडा देण्याचे त्यानी ठरवले होते. चाळीस हजार ही रक्कम काही थोडी थोडकी नव्हे.

उदयला या चर्चेत गम्य नव्हते. कारण, त्याला काही रामप्रसादांच्या मुलीशी लग्न करायचे नव्हते. तो आपला सबंध वेळ आसपासच्या राना–डोंगरात फिरवून घालवीत होता. रात्रीही तो बऱ्याच उशीरा अंथरूणात पडला. जागा झाला तो खळबळ ऐकून.

अजून पहाटही झाली नव्हती तरी गडबड चालू होती. प्रथम उदयला वाटले, वऱ्हाड आले असेल म्हणून ही धावपळ चालू आहे. नंतर उलगडा झाला. वऱ्हाड येणार नाही.

उदयच्या कानी काही गोष्टी पडल्या. वऱ्हाडी मंडळीवर दरोडेखोरांचा हल्ला झाला आणि त्यात बन्सीलाल गंभीर झाले. शिवाय तीस लोक ठारहि झाले ही बातमी अतिशय धक्का देणारी होती.

खुद्द या घटनेचा उदयला जबर धक्का बसला होता.

यापूर्वी उदयने अनेक दरोडे पाहिले होते. पण असा दरोडा तो अगदी प्रथमच पहात होता. तीस माणसे एका दरोड्यात ठार व्हावीत ही घटना साधी नव्हती.

उदयचे रक्त सळसळले. तो अतिशय चिडला. काही झाले तरी आपण याचा पत्ता लावायचा असा त्याने निर्णय घेतला आणि सरळ घोड्यावर स्वार झाला.

वाऱ्याच्या वेगात त्याचा घोडा धावत होता. त्याचे रक्त तापले होते. तीस माणसे ठार करायची म्हणजे खेळ आहे की काय ?

हा दरोडेखोर कोण ?

बरेच दिवस तो मोकळा होता. फारशी हालचाल करता आली नव्हती. आता बरीच करमणूक होणार असे त्याला वाटत होते. एका डोळ्यात दुःख

होते, वऱ्हाडी मंडळी कापली गेली म्हणून आणि दुसऱ्या डोळ्यात आनंद होता हातांची खाज भागेल म्हणून.

घटनास्थळी पोचला तेव्हा लोक तेथे होतेच. आता पोलिसही त्या ठिकाणी होते. उदयला भरवेगाने येताना पाहून पोलिसानी त्याला अडवले.

'कुठून आलास ?' त्याला पहिला प्रश्न विचारण्यात आला.

'ग्वाल्हेरहून.'

'नाव काय ?'

'उदयसिंह चौहान. ?

'इथं यायचं कारण काय ?'

उदय रोखून पहात उभा राहिला. हा प्रश्न त्या अधिकाऱ्याने अगदी गाढवासारखा विचारला होता. इतकी भयंकर दुर्घटना घडली आणि हा विचारतो का आलास म्हणून.

'येऊ नये का ?'

'प्रश्नांची उत्तरं दे–' गोरा साहेब कडाडला.

'मला हे सर्व पहायचं होतं. '

'पाहिलंस ?'

'नाही. '

'राहतोस कुठं ?'

'चौरंगी. धौलपूर जिल्ह्यात. लग्नाला आलो होतो मी. '

'आता परत जा. इथं पाहण्यासारखं काही नाही. आमच्या लोकाना कुणीहि अडथळा करण्याचे कारण नाही.' तो कडाडला आणि उदय झाशीच्या दिशेने निघाला.

घोडा दौडत होता आणि वर असलेला उदय विचार करीत होता... दरोडेखोर कोण ? त्याचे उत्तर उदयला झाशीला गेल्याशिवाय मिळणार नव्हते. तिथे नांव कळताच उदयने ठरवले, दरोडेखोराच्या मागेच लागायचे. वचपा व्याजा–सकट काढायचा.

वाटेतच त्याला एक घोडागाडी मिळाली. ती झाशीला दौडत निघाली होती. आणि आत जखमी दोघाना ठेवण्यात आले होते. माहिती काढायचीच तर ती या लोकांकडून मिळण्याची शक्यता होती.

त्यांच्याबरोबर तोहि दौडू लागला. तिघे घोडेस्वार गाडीच्या बरोबर होते.

आतल्या माणसांना बराच मार लागला होता. त्यांना कसे हलवावे याचा विचार करीत असतानाच पोलिस आले होते आणि त्यांना उचलून गाडीत टाका असे दोघानाहि हुकूम केले होते.

बोलता बोलता उदयला बरीच माहिती मिळाली होती. जसवंतसिंग दरोडेखोराचे नाव तो प्रथमच ऐकत होता. त्याचेच हे काम असावे असे खात्रीपूर्वक ती माणसे सांगत होती.

दरोडेखोराबद्दल काही गमतीशीर गोष्टीही तो ऐकत होता. अशाच गोष्टी त्याच्यातील एकादा कच्चा दुवा आपल्या हाती देईल असे त्याला वाटत होते असे झाले की दरोडेखोराच्या मागे लागणे सोपे जाणार होते.

त्याला अतिशय महत्वाची गोष्ट समजली होती, ती म्हणजे जसवंतसिंग हा कुठे एका ठिकाणी मुक्काम करून रहात नव्हता. रोज तो आपला मुक्काम बदलीत असे.

याचाच अर्थ जसवंतसिंगचा पत्ता शोधून काढणे कठीण होणार होते. अतिशय अक्कल खर्च करावी लागणार होती. घाम गाळावा लागणार होता आणि तशीच पायपीटही करावी लागणार होती.

० ० ०

जसवंतसिंग किती क्रूर होता हे सांगणे अतिशय अवघड आहे. क्रौर्याचे कोणतेही विशेषण त्याला त्या बाबतीत नामुष्कीचेच ठरले असते.

जसवंतसिंग हा अतिशय तरूण होता. ग्वाल्हेरच्या फौजेत त्याने दोनतीन वर्षे काढली होती. नंतर खाली मान घालून हुकूम पाळणे त्याच्या रक्ताला झेपले नाही. एक दिवस तो सरळ वीसपंचवीस माणसांना घेऊन फरारी झाला. जाताना त्याने भरपूर दारूगोळा आणि बंदुका पळवल्या होत्या.

तो जात्याच हुशार होता. गरीब घरात जन्माला आल्यामुळे पोट भरण्यासाठी त्याला ग्वाल्हेरच्या फौजेत दाखल व्हावे लागले होते. पण त्याचे मन एक दिवस बंड करून उठले. त्याच्याच विचारांशी मिळतेजुळते तरूण त्याला मिळाले आणि सरळ एक दिवस रात्री फरारी झाले.

वीस जणाना आपण ओढले, पण त्यानी आपले हुकूम नाकारले तर? काहीतरी भीति त्यांच्या मनावर हवी. आपला हुकूम त्यानी बिनबोभाट पाळायला हवा असे त्याला वाटत होते.

आपल्या माणसाना त्याने काही नियम घालून दिले होते. आणि त्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्याना लगेच ठार करण्यात येईल असे बजावण्यात आले होते.

धनवंत हा त्याचा एक सहकारी. अतिशय हुशार आणि धाडसी. बेदरकार वृत्तीमुळेच जसवंतसिंगला त्याची भीति वाटायची. एक दिवस त्याने कमालच केली. एके रात्री तो एका तरूणीला घेऊन तळावर आला.

जसवंतसिंगची त्याला कसलीच भीति वाटत नव्हती. कोणत्याही परिस्थितीत स्त्रीशी संबंध येता कामा नये हा त्याचा दंडक होता. तो या धनवंताने मोडला. शिक्षा काय होती, तर गोळी घालून ठार करण्याची.

आपल्याविरुद्ध ब्र काढण्याची जसवंतसिंगला छाती नाही व्हायची असे धनवंतला वाटायचे.

धनवंत एका पोरीला घेऊन तळावर आलेला आहे ही बातमी जसवंतसिंगला मिळताच त्याच्या तळपायाची आग मस्तकाला भिडली. क्रोधाने थर थरत तो उठून उभा राहिला आणि सरळ धनवंत होता त्या ठिकाणी आला

जसवंतसिंग कितीही कठोर काळजाचा असला तरी जे दृश्य त्याच्यासमोर होते ते तो सहन करू शकला नाही. एक अतिशय सुंदर तरुणी कशीबशी अब्रु दडविण्याचा प्रयत्न करीत उभी होती... विवस्त्र अवस्थेत आणि धनवंत? तो मुंगसाप्रमाणे झेप घेण्याच्या तयारीत होता. जवळ जसवंतसिंग आलेला आहे याचे भान त्याला नव्हते.

'धनवंत —' जसवंत ओरडला.

'काय झालं?' धनवंत क्रोधाने मागे वळून ओरडला. तो बेभान झाला होता, 'चालता हो इथून पुढे आलास तर मुंडी धडावेगळी करीन.'

जसवंत काहीच बोलला नाही. त्याने सरळ बंदुकीचा दस्ता धनवंताच्या डोक्यात घातला. मजबूत शरीराचा तो गडी डोके आवळून किंचाळत खाली कोसळला. जसवंताच्या मनावर त्याचा कोणताही परिणाम झाला नाही.

' तू कपडे घाल. ' तो अतिशय सौम्य आवाजात त्या मुलीला बोलला आणि बाजूला झाला. तोपर्यन्त धनवंताची किंकाळी ऐकून सर्वजण धावून आले होते.

' त्याला पकडा आणि झाडाला उलटा टांगा. जमिनीपासून कंबरभर उंचीवर त्याचे डोके राहिले पाहिले. ' जसवंताने हुकूम सोडला.

इतका भडकलेला जसवंतसिंग त्यानी प्रथमच पाहिला होता. इतके क्रौर्य त्याच्यात असू शकेल यावर कुणाचाही विश्वास बसत नव्हता. धनवंत तर अजूनही डोके गच्च धरून विव्हळत पडला होता.

' साधु. ' जसवंत किंचाळला आणि एक मजबूत शरीराचा तरुण पुढे आला.

' आज्ञा मालक. '

' हिला नांवगाव विचार आणि सोडून ये. ' तो ओरडून बोलला. आधीच गोरापान असलेला जसवंतसिंग आता तांबडालाल झाला होता.

साधु मुलीला घोड्यावर बसवून चालता झाला आणि त्यावेळी जखमी धनवंताला झाडावर टांगण्यात आले होते. ओरडूनच जसवंतसिंगाने आपल्या सर्व माणसाना जवळ बोलावले होते.

' आज जी घटना घडली ती आम्हा सर्वांना काळिमा आणणारी आहे. आम्ही दरोडेखोर असलो तरी प्रत्येकाला आई आहे, बहिण आहे. आपल्याच एका बहिणीची आपणच विटंबना करू शकतो का ? ' बोलता बोलता तो थांबला.

' नाही मालक. '

' स्वत:वरच स्वत: बंधने घालण्यासाठी आपण काही नियम केले. तुमचा पुढारी म्हणून तुम्ही मला प्रमुख नेमले. जरी तो नियम मी मोडला असता तर तुम्हाला अधिकार होता मला ठार मारण्याचा. '

सर्व गप्पच राहिले.

' तुम्ही बोलला नाहीत तरी ते सत्य आहे. तुम्ही मला शिक्षा करू शकला असता. धनवंताने एका मुलीला इथं आणलं आणि आपल्या अत्यंत महत्वाच्या अशा नियमाचा भंग केला. त्याला शिक्षा केल्याशिवाय आज आम्हाला गत्यंतर नाही. '

' होय मालक !'

' आज त्याला आपण सोडून दिलं तर तो पुन्हा दुसरा नियम मोडेल. त्याच्याच पावलावर पाऊल दुसराही कुणी ठेवू शकेल. मीही तो गुन्हा करू शकेन. तसं होता कामा नये. तेव्हा सांगा... धनवंतला शिक्षा करायची ना ? '

' होय मालक. ' सर्वजण ओरडले.

' चला तर... त्याच्या डोक्याखाली लाकडे रचून ठेवा. ' जसवंतसिंगने बजावले. सर्वजण निघून गेले.

पण पुढे काय घडेल हे कुणाच्याही लक्षात आले नाही. कठोरातील कठोर सजा तो आता धनवंतला देणार होता. पहाताना प्रत्येकाच्या हृदयाचा थरकाप उडायला हवा. धनवंताच्या आक्रोशाने काळीज कापून जायला हवे, छातीत धडकी भरायला हवी.

जसवंतसिंग मनात म्हणत होता, ही संधी आता गमावता कामा नय आपली खुर्ची भक्कम होईल ती या एकाच घटनेने असे तो समजत होता आणि ते खरेही होते.

काय घडणार ?

सर्वांचे प्रश्नचिन्ह खाड्कन तुटले आणि उत्तराची ज्वाला आकाशाला भिडली. पण प्रथम ती धनवंतच्या डोक्याला भिडली होती आणि त्याने आकाश दणाणून सोडणारी किंकाळी फोडली होती.

ती ऐकून जसवंतसिंग फक्त हसला.

बाकीचे सर्वजण जसवंतसिंग आणि धनवंत यांच्याकडे भेदरून आळी-पाळीने पहात होते.

जसवंत खूष होता. धनवंताच्या आरोळ्या त्याच्या काळजाला गुदगुल्या करीत होत्या. उद्यापासून काय बिशाद लागलीय त्याचे हुकूम न पाळण्याची. जी भीति त्याला निर्माण करायची होती ती त्याने केली होती.

–आणि तिसऱ्याच दिवशी जसवंतसिंगला दुसऱ्या एका प्रसंगाला तोंड द्यावे लागले. जी भीति निर्माण व्हावी म्हणून त्याने धनवंताला जिवंत जाळले होते ती भीति सर्वांच्या मनात निर्माण झालेली आहे हे त्याचे मत खोटे ठरले होते.

रांघा नावाचा त्याचाच एक अतिशय विश्वासू सहकारी पाचसहा जणांना घेऊन फुटण्याच्या गोष्टी बोलू लागला होता आणि त्याने सरळ सरळ जसवंतला द्वंद्वयुद्धाचे आव्हान दिले होते.

जसवंत चरकला !

रांघाबरोबर त्याने तीन वर्षे काढली होती. अतिशय धोकेबाज आणि ताकदवान माणसाबरोबर द्वंद्वयुद्ध खेळायचे ?

याचा अर्थ जसवंतसिंग दुबळा होता असा नव्हता. पण कुणालाही कमी लेखायचे नाही या त्याच्या वृत्तीमुळे तो विचारात पडला. आपल्या एकीला तडा जातो की काय असे त्याला वाटले. तसे होऊ नये असे वाटत होते, पण झाले त्यावर काहीतरी तोडगा काढायला हवा होता.

अखेर त्याने आणखी एक प्रयत्न करून पाहण्याचे ठरवले. दुसरा कुणी असता तर त्याने हा विचार केला नसता. आपण घाबरलो आहोत असे इतराना वाटेल म्हणून त्याने इभ्रतीसाठी सरळ द्वंद्वाला तयारी दर्शविली होती.

'रांघा, पुन्हा एकदा विचार कर,' जसवंतसिंग सौम्य शब्दात म्हणाला. सर्वजण दोघांकडेही पहात उभे होते. काहीतरी भयंकर घडणार आहे असे प्रत्येकाला वाटत होते. पण काय ? कदाचित एकमेकांवरही दोघेही गोळीबार करतील किंवा हातात सुरे घेऊन एकमेकांवर तुटूनही पडतील. कशाचीही शक्यता होती.

'तू विचार कर. राजा समजतोस स्वतःला.'

'नाही. आपण सर्व एक आहोत.

'मग तुझी मिजास का ?'

'मी मिजास केली याचं एकतरी उदाहरण देशील का ?' आवाजावरचा ताबा कायम ठेवीत जसवंतसिंग म्हणाला आणि रांघा तडकला.

'धनवंताला जिवंत जाळण्याचं कारण काय ?'

'मी त्याला जाळलं नाही.'

'हुकूम कुणी सोडला ?'

'सर्वांनी... आपण.'

‘ ही शुद्ध बनवाबनवी आहे. तुझ्या मार्गातील काटा तुला दूर करायचा होता. ’ रांघा जोरात ओरडून म्हणाला आणि जसवंत गार पडला.

‘ नाही रांघा. धनवंत तुझ्याहीपेक्षा मला प्रिय होता. प्रत्येक गोष्ट मी त्याचा सल्ला घेऊन करी. सर्वांपेक्षा तो बुद्धीमान होता. मला वाटतं तुम्ही सर्वजण हे मान्य कराल. अतिशय धाडसी होता तो. ’

‘ म्हणूनच तू त्याला ठार केलंस. ’

‘ का ? ’

‘ तुझी जागा तो घेईल म्हणून. ’

काय बोलावे हेच जसवंतसिंगला समजले नाही. पण काहीतरी बोलायला हवे होते. नाही बोलला तर लगेच सर्वजण गैरसमज करून घेणार होते.

‘ रांघा, धनवंताने गंभीर चूक केली. ती केली नसती तर तो तुझ्याहीपेक्षा चांगला होता. माझ्याशी तो कायम एकनिष्ठ राहिला होता. शिक्षा केली ती, यापुढे कुणीही आपणच केलेले नियम मोडून या संघटनेला धोका पोचवू नये म्हणून. ’

‘ यापुढे तू असाच वागशील. ’

‘ असा म्हणजे कसा ? ’

‘ एखाद्याच्या हातून चुकून नियमभंग झाला तर लगेच तू त्याला ठार करशील. ’

‘ नाही. ’

‘ कशावरून ? ’

‘ मी त्याला संधी दिली होती. पण ती त्याला घेता आली नाही. माझ्याच अंगावर चालून आला. तूच सांग, माझ्याजागी तू असतास तर काय केलं असतं ? ’

‘ त्याला एकतरी संधी दिली असती जगायची. माणसं आपण, चूक व्हायचीच.’

आता यापुढे काही बोलण्यात अर्थ नाही हे लगेच जसवंतसिंगने ओळखले.

‘ रांघा, चल, माझी द्वंद्वाला तयारी आहे. ’ गंभीर आवाजात जसवंतसिंग बोलला आणि ऐकणारे चरकले. रांघाला घाबरून तो ही चर्चा करीत आहे, असाच सर्वांचा ग्रह झाला होता.

'ऐका, मी द्वंद्वाला तयार आहे. यातला जो हरेल त्याला जिवंत राहण्याचा कोणताच अधिकार नाही. मघा मी याच्याशी बोललो ते घाबरलो होतो म्हणून नव्हे, तर याला एक संधी द्यावी म्हणून.'

'दुसरे, आज आपल्या टोळीत शूर माणसे जमा झालेली आहेत. शूर याचा अर्थ जनावरे नव्हेत. प्रत्येकाने माणूस म्हणून जगावे असे मला वाटते. जनावरासारखा वागला म्हणून धनवंत ठार झाला. आपल्यातला एकादा ठार होईल, याचाच अर्थ एक शूर माणूस जाईल. रांघा हा माझा शूर सहकारी असे मी समजत होतो. आताही समजतो. पण आज त्याच्या आग्रहाखातर मी द्वंद्वाला तयार झालो.'

द्वंद्वाची तयारी झाली.

दोघेही मैदानात आले. त्यांच्या हातात जंबिये होते. सर्वांनी श्वास रोखला होता.

दोघेही कसलेल्या शरीरांचे गडी होते. पण पाहताना रांघा जसवंतसिंगहून सरस होता. त्याचाच जय होणार असे त्याच्या बाजूच्या लोकाना वाटत होते. बाकीचे तर अगदी साशंक होते... भीतिने गारठले होते.

सुरुवात झाली !

चिडलेल्या रांघाने चित्त्याप्रमाणे जसवंतसिंगवर झेप घेतली. उजव्या हातातील जंबियाचा वार त्याने सफाईने केला होता.

वार केला आणि त्याचा परिणामही झाला. निसटता कट जसवंतसिंगच्या खांद्याला चाटून गेला होता. कपडे फाटले होते. आणि तो बाजूला धडपडला होता. रांघा विजयाने ओरडत होता.

आता आपण जसवंतला सहज ठार करू असे त्याला वाटत होते. तो उठून उभा राहण्यापूर्वीच रांघाने पुन्हा ओरडत झडप घातली.

जसवंतसिंग तयारीत होता. रांघा अंगावर येताच तो उठून उभा राहिला नाही. त्याने सरळ दोन्ही पाय रांघाच्या पोटात खुपसले आणि बाजूला पलटी घेऊन तो उभा राहिला.

रांघा वळवळला. तरीही तो पुढे झेपावला. तयारीत राहिलेल्या जसवंतसिंगवर त्याने चवताळून वार केला आणि किंचाळत बाजूला जाऊन पडला.

तो छाती दाबून ओरडत होता. जसवंतसिंगने त्याच्या छातीत वार केला होता. अतिशय परिणामकारकरित्या वार झाला होता. कोणताही धन्वंतरी त्याला आता जिवंत ठेवू शकणार नव्हता.

या घटनेनंतर सर्वच पारडे फिरले होते. मुकाट्याने त्याच्या आज्ञा पाळल्या जात होत्या.

पण जसवंतसिंग शेफारला नव्हता. तो अगदी पूर्वीसारखाच होता. शिवाय आता त्याने धूर्ततेने इतरांशी वागण्याचे ठरवले होते.

आपण सर्वांचा सल्ला घेतो असा आभास तो निर्माण करीत होता. याचा परिणामही त्याच्या कल्पनेप्रमाणे झाला होता. हळुहळू प्रत्येकजण त्याच्या शब्दासाठी जीव ओवाळायला तयार झाला होता.

लग्नाच्या वऱ्हाडावर हल्ला करायला जातानाही त्याने सर्वांचा सल्ला घेतल्याचे नाटक केले होते आणि सर्व लूट एकत्र करून स्वतः काही न घेता इतराना वाटली होती.

—ह आदाय त्याचे सहकारी विसरणे शक्य नव्हते.

: 3 :

लग्नाच्या वऱ्हाडावर दरोडा पडल्यानंतर पंधरा दिवसा-नंतरची ही घटना. जसवंतसिग विश्रांती घेत पडला होता. शोधाशोध करण्यासाठी आलेले पोलिस पुन्हा काही येणार नाहीत म्हणून तो दरोडा पडलेल्या ठिकाणीच काही अंत-रावर रानात मुक्काम ठोकून होता.

त्याने जागाही चांगली निवडली होती. दोन डोंगरांच्या खबदाडीतील. आता पुन्हा या भागात आपला शोध सुरू होणार नाही ही त्याला खात्री होती. शिवाय, नसे कुणी आलेच तर त्याला तोंड देण्याचीही त्यांची जय्यत तयारी होती.

अगदी सूर्य माथ्यावर जाण्यापूर्वीच बातमी आली. अतिशय आनंदाची बातमी होती ती.

एक अतिशय धनवान व्यापारी झाशीजवळची फार मोठी शेतजमीन विकत घेण्यासाठी येत आहे. ग्वाल्हेरहून तो निघालेला आहे. त्याच्याबरोबर त्याचा फक्त एकच नोकर आहे.

त्यांच्याकडे भरपूर पैसे आहेत अशीही बातमी त्याने आणली होती. दोघांशिवाय पाच रिकामे घोडे होते आणि त्यांच्यावर सामान लादले होते.

जसवंतसिगच्या तोंडाला पाणी सुटले. सरळ हल्ला करायचा. लुटायचे आणि निघून जायचे कुठेतरी दूर असा त्याने विचार केला आणि बैठक भरली. सर्वांनी एकमताने कौल दिला.

' साधु, दोघेतर आहेत. तुम्ही तिघेजण जा. दोघाना ठार करू नका. सर्व काढून घ्या आणि सोडून द्या. '

‘ मालक, सरळ ठार केलं तर ? ’

‘ नको. हत्या फार झाली. उपाय नसलाच तर त्याना ठार करायचं. ’

झाले... तिघेजण निघाले... घोडे दौडीत.

साधु हा विचारी होता. तसाच शूर. त्याला शांत स्वभावाचा जसवंतसिंग आवडत होता. जेव्हा दोघांचे द्वंद्वयुद्ध चालू होते, तेव्हा जसवंत ठार झाला असता तर साधुने त्याला आव्हान दिले असते.

कारण, विचारी असला तरी साधु हा जुगारी वृत्तीचा होता. आपण रांघाला सहज लोळवू शकू असे त्याला वाटत होते. जेव्हा त्याने खुद्द माल–कालाच आव्हान दिले तेव्हा प्रथम स्वत: पुढे व्हायचे त्याने ठरवले होते.

पण का कोण जाणे त्याने आपला विचार बदलला होता. आपला मालक भित्रा आहे अशी समजूत त्याला ठेवू द्यायची नव्हती. जसवंतच यशस्वी होईल असे त्याला मनोमन वाटत होते आणि नेमके तसेच झाले होते.

साधुइतका कुणालाही या घटनेने आनंद झाला नव्हता. मालकासाठी प्राण ओवाळून टाकायची त्याची तयारी होती.

त्याला मिळालेल्या बातमीनुसार तो व्यापारी सूर्य मावळण्यापूर्वीच जिथे त्यानी वऱ्हाडावर हल्ला केला होता त्या ठिकाणी येईल असा त्याचा अंदाज होता.

–आणि झालेही तसेच ! व्यापारी संथ चालीने आला होता. डोंगराच्या उतारावरून साधु त्याला न्याहळीत होता. दोघांकडेही हत्यार नव्हते.

साधुच्या मनात विचार आला, यात काहीतरी गोम आहे. हा भाग अस्थिर आहे हे सर्वांना माहित होते. दरोडेखोरांच्या लीला सर्वांच्या कानावर पोचल्या होत्या. मग हा व्यापारी इतका पैसा अडका घेऊन या भागात कोणतीही संरक्षणाची तयारी न करता आला तरी का ? हे कसे शक्य आहे ?

बराचवेळ विचार करूनही यात काय गोम आहे हे त्याला समजले नाही. आपण उगाचच घाबरलो तर नाहीना ? एकदम तिघानी अडवले तर ते काय हालचाल करणार होते ? केलीच तर तिघांपुढे त्यांचे काय चालणार आहे ?

मनाचा निश्चय करून साधु डोंगराचा उतार उतरला.

'थांबा–' तो दुरुनच ओरडला. तिघानीही हातातील बंदुका जय्यत तयारीत धरल्या होत्या.

दोघेही थांबले. ते भांबावले होते. भयंकर संकटाच्या जाणिवेने त्यांचे चेहेरे भयभीत झाले होते. पण व्यापारी हळूहळू बदलत चाललेला आहे हे साधूचे अनुभवी डोळे हेरीत होते.

'कशाला थांबायचं ?'

'सामानात काय आहे ?'

'का ?' व्यापारी रोखुन पहात म्हणाला.

'नीट बोलला नाहीस तर मरशील.' साधु शांतपणे म्हणाला. त्याने एका हाताने बंदुक व्यापाऱ्यावर रोखली होती. कोणत्याही क्षणी गोळी घालायची त्याची तयारी होती.

'तू दरोडेखोर आहेस ?'

'तुझा बाप. सर्व सामान ठेव आणि चालायला लाग. जा म्हणून सांगतो हे तुझं नशीब समज.'

'तुझं नशीब जाग्यावर आहे ना ?' व्यापारी हसला.

–आणि साधुने गोळी झाडली. एका हाताने. आपला नेम चुकत नाही अशी त्याला खात्री होती. पण ही गोळी चुकली. आणि साधुच्या कोपराला जखम करून एक गोळी गेली. व्यापाऱ्याच्या हातात आता पिस्तुल चकाकत होते.

दुसरा आवाज झाला आणि लगेच तिसरा. साधूच्या सहकाऱ्याने गोळी झाडण्याचा प्रयत्न केला आणि गोळी झाडल्याचे त्याला समाधान मिळण्या–पूर्वीच व्यापाऱ्याने त्याच्या डोक्यात गोळी घातली. तिसऱ्याला गोळी झाड–ण्याचे धैर्य झाले नाही.

यात काहीतरी आहे असे जे साधुला वाटत होते त्याचे उत्तर त्याला मिळाले होते. हा व्यापारी साधासुधा नव्हता. आपण एकदम पुढ्यात येण्यात चूक केली याचा त्याला आता पश्चात्ताप झाला. पण त्याला इलाज नव्हता.

व्यापाऱ्याने लगेच आपल्या नोकराला हुकूम सोडला. आणि नोकर तामिली करण्यासाठी पुढे सरसावला. त्याने तिसऱ्याच्या हातातली बंदुक

सरळ खेचून घेतली आणि हात धरून खाली खेचले. गडबड करण्याचे धैर्य त्याच्यात नव्हते.

नंतर घडले ते अनपेक्षित. व्यापाऱ्याने सरळ साधूच्या डोक्यात गोळी घातली आणि नंतर खाली पडून वळवळ करणाऱ्या त्याच्या सहकाऱ्याच्या डोक्यात.

'याचे हातपाय बांध.' व्यापारी नोकरावर ओरडला. काही गडबड होऊं नये म्हणून तो पिस्तुल हात – धरूनच उभा होता. कारण, तिघांचे आणखीहि सहकारी आजूबाजूला लपून राहिले असतील असे त्याला वाटत होते.

दरोडेखोराचे हातपाय बांधून त्याला एका घोड्यावर टाकण्यात आले आणि प्रेते त्याचजागी टाकून ते झांशीच्या बाजूला निघाले.

पण ते फारसे दूर गेलेच नाहीत. आडोशाची जागा पाहून ते दडून राहिले. तिघांच्याहि शोधासाठी कुणीतरी येईल असे त्याला वाटत होते.

० ० ०

जसवंतसिंग बेचैन झाला. एव्हाना साधु यायला हवा होता. तो कुठे दडून बसणार आहे हे त्याला माहित होते. त्याने लगेच चौघाना शोधासाठी पाठवले.

सूर्य मावळला होता. चौघेही डोंगर उतरत होते. माळावर त्याना तिन्ही घोडे उभे दिसत होते. आणि खाली काहीतरी पडले होते.

चौघेहि सावध झाले. ज्याच्यावर सर्व जबाबदारी होती त्याने एकाला मागे ठेवले आणि तिघे सरळ मैदानात उतरले. घोड्यांवरून खाली उतरण्याचे धैर्य त्याना झाले नव्हते.

त्यानी पाहिले, साधु रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. दुसराही एकजण तसाच पडला होता. तिघेहि घाबरून खाली उतरले. त्यांची भोवताली नजर होतीच. दोघेहि ठार झालेले आहेत हे पहाताक्षणी त्यानी ओळखले होते.

'याना घेऊन जायचं.' एकजण म्हणाला.

'बाला कुठं आहे?'

'तेच तर समजत नाही. त्याला कुठंतरी टाकून दिलं असेल दूर नेऊन.' पहिला गंभीरपणे म्हणाला.

'जखम घेऊन रानात पळाला असेल.'

'घोडा इथं आहे.'

'घोड्यावरून पडल्यानंतर पळाला असेल.'

दोघानाहि ती शक्यता वाटली. तसे घडणे शक्य होते. दोघानी साधुला उचलन घोड्याच्या पाठीवर घालायची तयारी केली आणि लगेच ते खाली आपटले. दोघांच्याहि शरीरात गोळ्या शिरल्या होत्या. एकाच्या पाठीत आणि दुसऱ्याच्या डोक्यात.

तिसऱ्याला गोळी घालण्याचे धैर्य झालेच नाही. त्याने सरळ घोड्यावर उडी घेतली आणि भरधाव निघाला. पाठीत दोन गोळ्या घेऊन तो चालला होता. हा हा म्हणता तो डोंगराच्या बाजूच्या झाडीत शिरला होता

चौथा हे सर्व पहात होता. आपण नेमके काय करावे हे त्याला समजत नव्हते. गोळी झाडण्याचेहि त्याला धैर्य होत नव्हते.

आपला सहकारी धावत येताना पाहून तो आणखी घाबरला आणि मागे फिरला. आपल्या जखमी मित्राबरोबर त्यानेहि घोडा फेकला.

दोघानाहि पाहून जसवंतसिंगला आश्चर्य वाटले. जखमी सहकारी तर खाली आदळला होता.

'काय झालं ?' जसवंत घाबरून म्हणाला. ही परिस्थिती त्याला सर्वस्वी नवीनच होती.

'साधु ठार झाला. तिघेहि मेले.'

'तुमचं काय झालं ?'

'दोघाना गोळ्या घातल्या. अचानक झाडीतून एक व्यापारी घोडेस्वार आला. त्याने गोळ्या झाडल्या. मी पळण्याचा प्रयत्न केला. पण...पण जमले नाही.' बोलता बोलता त्याने मान टाकली होती. पाठीत शिरलेल्या गोळीने हृदयाचा वेध घेतला होता.

'चला सर्वजण–' जसवंतसिंग उभा राहत ओरडला. तो रागाने थरथरत होता. ताबडतोब आपण गेलो तर गोळीबार करणारा जवळपास असेल असे त्याला वाटत होते.

–आणि क्षणात घोडे फेकले गेले.जिवाच्या आकांताने पळावे तसे ते पळायला लागले. वरचे स्वारही तापले होते. आपली पाचसहा माणसे मारणारे जिवंत राहता कामा नये अशा जिद्दीने ते धावत होते.

चार तुकड्यानी वेगवेगळ्या दिशानी ते खाली मैदानात उतरले. मैदान साफ रिकामे होते. साधु किंवा इतर ठार झालेले सहकारी तिथे नव्हते किंवा घोडेही नव्हते.

'मालक इथं होते.' डोंगरावरून ज्याने पाहिले होते तो म्हणाला.

'मग ते गेले कुठं ?' जसवंतसिंग चिडला होता. त्याला तो तरी काय उत्तर देणार होता ? अशावेळी आपल्या तोंडून आगळाउणा शब्द गेला तर आपली धडगत नाही हे तो ओळखून होता.

पुन्हा घोडे उधळले गेले. सर्व आसमंत पालथा घातला गेला पण गोळीबार करणारा सापडला नाही आणि ठार झालेली त्यांची माणसेहि सापडली नाहीत.

हे आहे काय ?

जसवंतसिंग चक्रावला होता.

'ताबडतोब वेश पालटून तू झाशीला जा.' तो एका किरकोळ शरीराचा घोडेस्वारावर ओरडला, 'आणि बैजूला ताबडतोब खबर कळवायला सांग, ग्वाल्हेरहून आलेला व्यापारी झाशीला कुठं उतरलेला आहे.'

उलट विचारण्याचे धाडस बैजूत नव्हते. नाहीतर त्याने नेहमीप्रमाणे विचारले होते. विचारण्याचे त्याच्या अगदी जिभेवर आले आणि शब्द घशात अडकले. चिडलेला जसवंतसिंग काहीही करण्याची शक्यता होती. तो लगेच तिथून निघून गेला.

आणि जसवंतसिंग मान खाली घालून आल्या वाटेने निघाला. त्याने जागा बदलण्याचे ठरवले होते. बैजू कामगिरीहून आला म्हणजे त्याला मालक कुठे आहे आणि आपल्या टोळीचा मुक्काम कुठे आहे हे समजणार होते.

कारण, त्यांच्या काही खुणा होत्या. मुक्काम इथून बदलायचा झाला की लगेच तो तिथे खूण ठेवीत असे. त्या खुणेवरून त्यांचा मुक्काम समजत असे.

तो आपल्या सर्व माणसासह पूर्वीच्या मुक्कामावर आला आणि सर्व सामान घेऊन लगेच त्यानी पुढे कूच केले. आपण कुठल्या दिशेला गेलो आहोत याची खूण मागे ठेवायला तो विसरला नाही. त्याला कुठे जायचे हे माहित

नव्हते. कोणतीहि जागा त्याच्या लक्षात नव्हती. पण एक दिशा त्याने धरली होती.

तो सर्व भाग त्याच्या चांगल्या परिचयाचा होता, दगडन् दगड आणि झाड नि झाड त्याच्या माहितीचे होते. काळोखात त्यांचे घोडे त्याना कोणताहि अडथळा न होता घेऊन जात होते.

आणि त्यावेळी जसवंतसिंग विचार करीत होता की, व्यापारीच होता का तो ? का पोलिस खात्याचा एकादा माणूस असावा ?

त्याचे कोडे लौकरच उलगडणार होते. तो पोलिस खात्यातील असला तर त्याच्याशीही सामना देण्याची त्याची तयारी होती. साधुच्या खुनाचा बदला तो घेणारच होता.

तो वेडापिसा झाला होता तो एकाच गोष्टीसाठी–त्याच्या अबाधित सामर्थ्याला सामना करणारे कुणीतरी पुढे झाले होते.

व्यापाऱ्याच्या वेशात उदयसिंह चौहान हा दरोडेखोरांचा काळ आलेला आहे असे कुणी त्याला सांगितले असते तरी त्याच्या लक्षात आले नसते.

: ४ :

उदय एकटाच निघाला होता. बावळट वेश, घोड्याच्या पाठीवरील मळकट थैलीत अर्धी बाहेर दिसणारी बंदुक. त्याला एकाद्याने पाहिले असते तर हसू आल्याशिवाय राहिले नसते.

त्याला कुठेही जाण्याची घाई नव्हती.

चालता चालता त्यालाही हसू येतच होते.

घोड्याच्या पाठीवर बसायची त्याची तयारी नव्हती. कारण, त्याला काहीतरी शोधायचे होते. बाला या दरोडेखोराच्या माणसाला त्याने असे काही पिटले होते की ज्याचे नांव ते.

गेंड्याची कातडी त्याची. उदयला दाद देईल तरच नवल... रक्त ओकायची पाळी आली तरी गप्पच. आपण दरोडेखोर नव्हे हे सांगायची त्याची तयारी होती. पण त्यावर उदयचा विश्वास बसणार नाही हेही त्याला तितकेच माहित होते.

उदय देखील जाणून होता की, आपण जर फक्त त्याच्या शरीरावरच मारीत राहिलो तर हे अधिकच कठीण होईल; इतका मार देऊनही बाला बोलत नाही याचाच अर्थ असा होता की मरणाची त्याला भीति नव्हती.

मग काय करणार ?

उदयने खूप विचार केला. एकादा पुरावा किंवा कच्चा दुवा तोही जिवंत सापडला तर त्याला कसे हाताळावे याचा विचार त्याने कधीच केला नव्हता.

अखेर उदयने हात थांबवला. मारून हे प्रकरण भागायचे नाही हे लगेच

त्याच्या लक्षात आले. चुचकारूनही भागण्यासारखे नव्हते. आणि बालाच्या मागे लागून त्याला वेळही घालवायचा नव्हता.

आपण जसवंतसिंग दरोडेखोराची पाच माणसे खाली लोळवली याचाच अर्थ चिडून तो आपली शोधाशोध करणार होता. ताबडतोब तो खाली उतरून धावून आला तर ते उदयला जड जाणार होते. चारी बाजूनी दहाबारा घोडेस्वारानी घेरून गोळीबार केलाच तर त्याला तो कसे काय तोंड देणार होता ?

दरोडेखोरांच्या पद्धती त्याला माहित होत्या. एकदा चिडले की सरळ डोकेफिरूप्रमाणे ते हल्ला करीत होते. हल्ल्याला डोकं शांत ठेवून तोंड देणे नंतर कठिणच होणार होते.

उदयने कैद्याला घेऊन सरळ नदी ओलांडली होती आणि एका अवघड जागी जाऊन त्याने आपल्या कैद्याला ठेवले. प्रेते त्याने सरळ नदीत सोडली होती आणि दोन दिवसांसाठी बोलावलेल्या त्या एका शूर तरुणाला त्याने सरळ निमच्याच गावाला पाठवून दिले. घोडेहि त्याच्याबरोबर दिले.

'सरळ भलत्याच रस्त्याने ग्वाल्हेरला जा आणि हे पाचही घोडे विकून टाक. फायदा होईल तुझा.' उदयने त्याला कानमंत्र दिलाच होता.

युक्ती साधीच, पण ती इतकावेळ का सुचली नाही याचेच त्याला आश्चर्य वाटले. लगेच तो कामाला लागला. मरणाला न घाबरणारी माणसं त्याने पाहिली होती, पण त्यांच्या मनावर ताण दिला तर तो असह्य होणारी माणसेही त्याने पाहिली होती.

'बाला, तू काही फार मोठं ध्येय घेऊन जसवंतसिंगाच्या टोळीत सामील झाला नाहीस. मी तुला भरपूर पैसे देईन. इतके कीं, तुला नोकरी करायची गरजच भासणार नाही. तेव्हा मला जसवंतचा पत्ता सांगण्यात काय हित आहे याचा विचार कर.'

'मला माहित नाही.'

'माहित असलंच पाहिजे. मी तुला इथून सोडलं तर तू सरळ तुझ्या मालकाला भेटायला जाशील. तो कसा काय जाणार आहेस तेवढंच मला सांग.' उदय शांतपणे बोलत होता.

बाला काहीच बोलला नाही. तो फक्त पहातच राहिला. दुसरा कुणी असता तर तो वेदनानी तोंड वेडेवाकडे करीत राहिला असता उदयने त्याला भरपूर चोपले होते.

–आणि आता तो वेगळ्या प्रकाराने बालाला चोपणार होता. आपले नांव सांगण्यापलिकडे बालाने त्याला काहीच सांगितले नव्हते.

चिडलेल्या उदयने बालाला सरळ आडवा पाडला आणि तो त्याच्या पाठीवर बसला. त्याचे दोन्ही हात मागे बांधलेलेच होते.

' बाला, बोल. नंतर बोलावंच लागेल. '

तरीही बाला बोलला नाही आणि एकाएकी जोरात ओरडला. उदयने त्याचे करंगळीचे बोट काड्कन मोडले होते आणि आता तो तेच बोट हातात धरून वाकडे तिकडे करीत होता.

' तुलाही वेदना होतात तर ! अरे बाला, तू एक वेळ मरणाला भिणार नाहीस. पण या वेदनामुळे नमावे लागेल. निष्कारण हट्टापायी कशाला जिवाचे हाल करून घेतोस ?' उदय बोलत होता.

बाला पुन्हा लगेच शांत झाला. कितीही वेदना झाल्या तरी चालतील, पण तोंडातून एक ब्र काढायचा नाही. असा त्याने मनाशी निश्चय केला असावा.

उदयने लगेच दुसऱ्या हाताची करंगळी धरली आणि बालाला कोणतीही कल्पना येण्यापूर्वीच उलटी केली. हाड मोडले ! काही असो, या वेदना सहन करणे बालाच्या शक्तीबाहेरचे होते.

' थांब, मला मारू नकोस–' बाला वेदनानी विव्हळत कसाबसा म्हणाला उदयला त्या एकाच गोष्टीचा आनंद झाला. काही झाले तरी बाला बोल–णारच.

' हं सांग. ' त्याला सरळ बसवीत उदय बोलला.

' मी सांगेन, पण मला काय देशील ?'

' मारणार नाही; हे काय थोडं झालं ?'

' मला सोडणार आहेस ?'

' नाही, '

'मग मला ठार कर.' बाला जोरात ओरडला. त्याचे तोंड वेडेवाकडे होत होते.

'विचार कर बाला. तुला मी ताबडतोब सोडून दिलं तर तू सर्व काही जसवंतसिगला सांगशील. तसं झालं की मला धोका होईल. तुला मी चार दिवस अगदी सुरक्षित जागी ठेवीन. नंतर सोडून देईन.'

'नाही. सर्व समजताच तू मला ठार करशील.'

'तुझ्या डोक्यात एकच गोळी घालून ठार करणं तुला परवडेल का अशी सर्व बोटं मोडून, कान फोडून सोडून देणं परवडेल? बोल. संधी हवी ती तुला देतच आहे.'

'मला जीवदान देणार नाहीस.'

'घ्यायची जबाबदारी तुझ्यावर आहे. त्याचा मला फक्त मोबदला हवा. तू आज सांगितलं नाहीस तरी उद्या दुसरा कुणीतरी सांगेल. नीट विचार कर बाला. उद्या तुला कोणत्या परिस्थितीत जगावं लागेल याचा.' उदय शांत पणे बोलत होता.

कदाचित बालापुढे आपल्या भवितव्याचे चित्र उभे राहिले असावे. समोरचा बावळट तरूण बोलल्याप्रमाणे केल्याशिवाय राहणार नाही याची त्याला खात्री पटली होती.

त्याच्या मनात संघर्ष सुरू झाला होता. काहीतरी करायला हवे, पण काय ते त्याच्या डोक्यात शिरत नव्हते. वाघ म्हटले तरी खातो. वाघोबा म्हटले तरी खाणारच. त्याने सर्व काही माहिती सांगितली तरी आपली सुटका होईलच याची खात्री त्याला नव्हती.

अखर मनाचा निर्णय करून त्याने बोलायला सुरवात केली. उदय त्याला भराभर प्रश्न विचारीत होता आणि तोहि लगेच त्याचे उत्तर देत होता.

उदयने नीट विचार केला. बालाने सांगितलेली माहिती अतिशय महत्वाची होती. जसवंतसिग किती हुशार आहे याची कल्पना बालाच्या उत्तरांवरून त्याला आली होती.

पण त्याचे काय करायचे याचा तो विचार करीत होता. इथून त्याची सुटका केली आणि तो सरळ जसवंतसिगकडे जाऊन सर्व सांगणार होता

आणि धूर्त असा तो दरोडेखोर लगेच आपल्या हालचाली बदलून टाकत होता.

त्याला तसे करायचे नव्हते. बालाला सहजासहजी तो सोडण्यास तयार नव्हता.

अखेर त्याच्या मनाचा निश्चय झाला आणि कोणताहि मागचा पुढचा विचार न करता त्याने बालाच्या डोक्यात गोळी घातली. कोणत्याहि वेदना न होता, त्याने बालाला मरण दिले.

आणि आता तोच उदय बावळट वेशात रानात फिरत होता. रानात कुठे कसल्या खुणा दिसतात का ते न्याहाळीत होता. योग्य दिशेला आपण जात आहोत याची तो नीट खात्री करून घेत होता

जसवंतसिंगाच्या मुक्कामाने त्याला आणखी एक कोडे उलगडले होते. त्याचे जरी रानात निरनिराळ्या ठिकाणी भ्रमण होत असले तरी मुक्काम हा मात्र त्याच्या पूर्वीच्याच जागी होत असे. तशा जागाही भरपूर होत्या. त्याच जागा तो आलटून पालटून बदलीत असे. साहजिकच शोध घेणाऱ्याला वाटे जसवंत हा आपली टोळी घेऊन सारखा मुक्काम हलवीत असतो. पण वास्तवात दुसरेच होते.

शिवाय, तो मुक्काम हलवताना चुलीतली राखहि मागे राहू नये याची खबरदारी घेत होता. ती कुठेतरी नदीत किंवा नाल्यात सोडून दिली जात होती.

त्याने कितीतरी अंतर तुडवले होते. सूर्य डोक्यावर घेऊन कासावीस करू लागला तरी तो चालतच होता. एका शेतकऱ्याकडून त्याने सकाळीच वाटेत काही दशम्या करून घेतल्या होत्या. त्या त्याला भुकेची आठवण करून देत होत्या.

विचार करीत तो चालत असतानाच त्याच्या अगदी कल्पनेप्रमाणेच घडले.

चार घोडेस्वारानी त्याचा मार्ग अडवला होता.

चौघेहि दरोडेखोर होते. उदयने हातात घोड्याचा लगाम घेतला होता. त्याने मनात आणले असते तर चौघानाहि खाली लोळवले असते.

‘ कोण आहेस ?’ एकाने त्याला दरडावले.

‘ का ? ओळखायला येत नाही ?’ बावळट चेहेरा करीत पण जोरात उदयने विचारले

‘ नीट सांग, नाहीतर डोक्याच्या चिथडया करून सोडीन.’ दरोडेखोर पुन्हा गरजला.

‘ भोला पांचाल.’ उदय सहजरीत्या बोलला. लगेच त्याला आपल्या भोला पांचालची आठवण झाली होती.

‘ काय करतोस ?’

‘ तुम्ही कोण ?’

‘ तू करतोस काय ?’ हातातील बंदुक नाचवीत घोडेस्वार तडकला. त्याचा चेहरा क्रुद्ध झाला होता.

‘ मी काहीच करीत नाही.’

‘ रानात काय काम ?’

‘ पोलिसाना चुकवायचं तर कुठं शहरात राह्यचं ?’

‘ पोलिसाना ?’

‘ हो.’

‘ चल माझ्याबरोबर--’ तो [illegible] करून त्याच्याकडे पहात राहिला. [illegible] लोक जसवंतचेच आहेत आणि आता [illegible] जात आहेत हे त्याच्या लक्षात आले होते.

‘ चल.’

‘ नाही. तुम्ही मला पोलिसांकडे न्या.’ उदय जरा धाडसाने बोलला.

‘ पोलिस ?’ तो खदखदा हसत म्हणाला.

‘ हो पोलिस. ते सरळ मला गोळी घालतील.’ उदयने आणखी एक पिलू सोडले.

उदय त्यांच्याबरोबर चालत राहिला.

‘ हे बघ, असा रेंगाळू नकोस.’ त्याच्या घोडयावरची बंदूक काढून घेऊन तो दरोडेखोर गरजला, ‘ घोडयावर बस आणि आमच्याबरोबर रहा. पळून जायचा प्रयत्न केलास तर पाठीत गोळी घालीन.’

...गो ३

'मला मारू नका. मी पळणार नाही–' उदय घाबरत म्हणाला.

दौडत पाचही घोडे निघाले आणि थोड्याच वेळात ते सभोवताली गर्द झाडीत असलेल्या एका माळावर पोचले.

माळावर सुमारे पंधरावीस लोकांचा मुक्काम होता. चुली पेटत होत्या. आणि घोड्याना एका बाजूला रांगेत बांधण्यात आले होते.

'मालक, हा रानात फिरताना सापडला.' उदयला एका भारदस्त चेहऱ्याच्या आणि शरीराच्या तरुणापुढे उभे करीत मघाचा दरोडेखोर म्हणाला. हाच तो जसवंत दरोडेखोर असावा हे तत्काळ उदयच्या लक्षात आले होते.

उदय खूष होता, पण त्याच्या चेहऱ्यावर भीतिचे भाव होते. बावळट चेहऱ्यावर ते विचित्रच वाटायचे.

जसवंतसिंग बराच वेळ त्याचे निरीक्षण करीत होता. कोणताही प्रश्न त्याने त्या अवधीत विचारला नव्हता.

'हं! नाव काय ?' शांतपणे स्वतःच्या मांडीवर थाप देत जसवंतसिंगानें विचारले.

'भोला पांचाल.'

'करतोस काय ?'

'काम नाही.'

'मग ? आता रानात काय करीत होतास ?'

'मी पळून आलोय. पण मला पोलिसांच्या हवाली करू नका. तुम्ही सांगाल ते मी ऐकेन.'

'पोलिसांना घाबरतोस ?'

'नाही.'

'मग ?'

'आपण पोलिसांकडे मला द्याल म्हणून घाबरतो हो. हातात शस्त्र आणि घोडा असला की मी घाबरत नाही. हो...देवाच्या बापालाहि घाबरत नाही.'

'आता का घाबरलास ?'

'हातात बंदूक द्या आणि मला घोड्यावर बसायला द्या मग बघा मी कसा आहे तो.

'आमच्याशी लढशील ?' जसवंतसिंगने विचारले.

'नाही.'

'का ?'

'कशासाठी लढायचं ?'

'बाकीचे कशासाठी लढतात ?' जसवंत रोखून पहात बोलत होता. अतिशय शांत होता तो. त्याला उदयसिंहाच्या बोलण्याची गंमत वाटली होती.

'आपसात लढतात ?'

'आपसात ? तुझा आणि आमचा काय संबंध ?'

'म्हणूनच तर मला लढायचं नाही. कारण तुम्ही माझं काहीच वाईट केलं नाही. पण आपण कोण ते सांगाल काय ?' उदय धीटपणाचा आव आणीत म्हणाला.

'जसवंतसिंग दरोडेखोराचं नाव तू ऐकलंस ?'

'नाही.'

'तू आलास कुठून ?'

'अजमेरहून.' उदय म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावर समाधान झळकत होते.

'हे बघ भोला पांचाल. मीच तो जसवंतसिंग. तुझं पोलिसांशी वाकडं असलं तर इथंही जमेल. तुला नीट बंदूक झाडता येते काय ?'

'हो. नेमबाजीत मी फार प्रवीण आहे.'

'तू ?' अविश्वासाच्या जाणिनेने जसवंत आश्चर्याने म्हणाला. उदय शांत उभा होता.

'आपण माझी परीक्षा घ्या. तीन पोलिसाना मी लोळवून पळालो. धावत्या घोड्यावरून असते माझी नेमबाजी.' उदय छाती पुढे काढून म्हणाला.

त्या अवधीत जसवंतच्या डोळ्यानी एक गोष्ट हेरली होती ती ही की, भोला पांचाल वाटतो तितका भोळा नाही. शिवाय तो वाटतो ति तका दुब–ळाही नाही. चेहेरा लहान असल्यामुळे तो किरकोळ वाटत होता. पण त्याचे शरीर पिळदार आणि मजबूत होते.

' मी तुझी जरूर परीक्षा घेईन. तू आमच्याकडे राहशील ? '

' कशासाठी ? '

' आम्ही दरोडे घालतो. तूही त्यात भाग घ्यावास. '

' दरोडा ? '

' हो त्यात काय वाईट आहे ? दरोडे घालणे उलट चांगलं–' जसवंत समजुतीच्या सुरात म्हणाला, ' श्रीमंत लोक भयंकर छळतात गरीबाना. आम्ही गरीब लोक. भूक लागली तर पोट भरायला रोटी नाही द्यायचे प्रामाणिकपणाने. मग त्यांची संपत्ती काढून घ्यायची. तुला वाटलं तर तू दान करू शकतोस गरिबाना. '

' मी ते काम कधीच केलं नाही. '

' तू निशाणबाज आहेस ना ? '

' हो. '

' एकाचवेळी तू किती हत्यारबंद माणसांशी लढशील ? '

' फारतर चौघेजण. '

' चौघेजण ? '

' हो. '

' माझ्या चार माणसांशी लढशील ? ' जसवंत रोखून पहात म्हणाला.

' नाही. '

' का ? '

' नाहक आपली शक्ती नाहीशी होईल. निष्ठावंत माणसं मिळणं कठिण असतं हल्ली ! ' उदय बावळटपणे बोलला.

' तू फार हुशार आहेस. ' जसवंत म्हणाला. ' बोलतोस अगदी शहाण्या-सारखं. '

' फार विचार करतो मी. '

' कसला ? '

' दोन वेळा पोट भरण्याइतकी रोटी कशी मिळेल. '

' तुला चार वेळ रोटी देईन. तू परीक्षा दे. '

' माझी बंदुक ? ' उदय आजुबाजूला पहात म्हणाला.

'भाई, याची बंदुक दे याला.' जसवंत ओरडला आणि ज्याने उदयला जसवंतसिंगसमोर आणले होते तो धिप्पाड शरीराचा दरोडेखोर समोर आला. त्याच्या हातात उदयची बंदुक होती. काही न बोलता उदयने ती घेतली.

'हं...भोला... दाखव तुझी करामत.'

उदय काहीच बोलला नाही. त्याने सरळ आपल्या घोड्यावर झेप घेतली आणि निघाला. घोडा भरधाव धावताना त्याच्या बंदुकीतून गोळी सुटली; शांत वातावरणात तो आवाज बराच घुमला.

जसवंतसिंगची नजर सहज आकाशाकडे गेली. एक घार भिरभिरत खाली येत होती. ती जमिनीवर पडली तेव्हा उदय जसवंतसिंगसमोर उभा राहिला होता.

'शाब्बास भोला. तू खरा शूर आहेस.'

भोला उर्फ उदय खूप झाला. त्याचा सहजरित्या जसवंतसिंगच्या टोळीत प्रवेश झाला होता.

'आता बोल. राहणार [illegible] इथं '

'राहीन.'

'प्रामाणिकपणाने काम करशील ?'

'हे काय विचारणं झालं काय ? कामच करायचं तर ते प्रामाणिपणाने. नाहीतर सरळ निघून जावे.'

'भाई, हा आजपासून आमच्यात राहील. याची सर्वांशी ओळख करून दे. शिवाय, या भागाची त्याला काही माहिती नाही. नीट काळजी घ्या त्याची.'

भाई नांवाच्या दरोडेखोराबरोबर उदय तिथून निघाला.

: ५ :

भोला पांचाल !

हसला तो. दोन दिवस त्याचे मजेत गेले होते. सर्वांचा त्याने विश्वास संपादन केला होता. आणि सांगायचे म्हणजे सर्वांचे विचार त्याला पटले होते. आपण एक जमीनदार आहोत हे तो साफ विसरला होता.

卐

–पण जसवंतच्या टोळीला संपवायचा त्याचा निश्चय मात्र काडीभरही कमी झाला नव्हता.

त्याची परीक्षा पाहण्यासाठी जसवंतसिंगने त्याच्यावर एक कामगिरी सोपविली होती. स्वतःच्या जबाबदारीवर तो दरोडा घालणार होता. चारच माणसे त्याच्या हाताखाली जसवंतसिंगने दिली होती.

आणि दरोडा घालायचा कुठे ? तर दतियामधील एका व्यापाऱ्याच्या घरावर.

घराचा मालक कोण हे त्याला सांगण्यात आले होते. जर जमलेच तर त्याने स्वतःच्या जबाबदारीवर आणखी दोन दरोडे घातले तरी जसवंत–सिंगला त्याची पर्वा नव्हती. तेही त्याने स्पष्ट सांगितले होते.

भोला पांचालने ज्या घरावर दरोडा घालायचा तो एका जमिनदाराचे घर होते. जमीनदाराचे शूर असे चार मुलगे त्या घरात असताना.

यापूर्वी एका दरोडयाची माहिती जसवंतसिंगने भोलाला सांगितली होती. ठार झालेल्या साधु नांवाच्या सहकाऱ्याला त्याने त्या घरावर पाठवले होते. नऊ माणसे घेऊन त्याने हल्ला केला होता. आणि साधु... चार माणसे गमावून परत आला होता.

'मालक, आपण काळजी करू नका. हा भोला अशा कामात माघार घेणार नाहीं. पण तुम्ही देणार त्या माणसाना सांगा, मी सांगेन त्यापलिकडे त्यांनी जाता कामा नये.'

'ते मी त्याना पूर्वीच सांगितलेलं आहे. जो कामगिरीवर गेल्यानंतर हुकूम पाळत नाही त्याला आम्ही अतिशय कडक शिक्षा करतो. कामगिरीत अप-यशी झाला तरी आम्ही त्याचे कौतुक करतो. कारण, यशाबरोबर कधी-कधी अपयशाचेही वाटेकरी व्हावे लागते आम्हाला.'

पन्नालाल ठाकूर हा दतियामधील फार मोठा नसला तरी भरपूर माया बाळगून असलेला. आजवर इतक दरोडे पडले, पण एकानेही त्याच्या घरात शिरकाव केला नव्हता. अशा ठाकूराच्या घरावर दरोडा घालायचा आणि तोही फक्त चार माणसे जवळ बाळगून हे साधेसोपे काम नव्हते. तो प्राणांशी खेळ होता.

दरोडेखोरांच्या कळपात आपण प्रवेश केला. ठीक झाले होते ते. आपणही एक दरोडा घालून त्यांच्या जीवनाचा अनुभव घ्यावा काय ? पण मन तयार झाले नाही. दरोडा घातला की त्यात एकाददुसरा माणूस ठार झाला तर ? तर ते पाप कुणाच्या माथी मारायचे ?

ठाकुराचे घर भरवस्तीत होते. घोडयाच्या टापांचे आवाज ऐकून तो भाग कितीही रात्री जागा होत असे.

भोला पांचाल कामगिरीवर निघाला तेव्हा संध्याकाळ झाली होती. सूर्य मावळण्याच्या बेतात होता. अतिशय आत्मविश्वासाने भोला आपली चार माणसे घेऊन चालला होता.

जसवंतसिंगच्या टोळीतील सर्वांनाच या गोष्टीचे आश्चर्य वाटले होते. खरे म्हणजे हा मान होता भाईचा. साधुनंतर भाईचा नंबर. पण नुकताच आलेला बावळट पोरगा मालकाने का निवडावा याचे कोडे भाईला पडले होते. तो रागाच्या भरात जसवंतसिंगाकडे आला.

'मालक, मी काय कमी पडलो असतो ?'

'कशात ?' जसवंत आश्चर्याने म्हणाला. हा गृहस्थ असा झपाटल्या-सारखा आला कसा याचे त्याना कोडे पडले होते.

'दरोडयाला जायचा मान माझा.

'हो...आलं लक्षात. भाई, असा शांतपणे बस.'

चिडलेला भाई बसला. तो बोलत नसला तरी त्याचा राग कमी झाला नव्हता.

'भाई, भोला पांचालची आपणाला एकदा परीक्षा घ्यायलाच हवी होती... हे तू मान्य करशील की नाही ?'

'हो.'

'[illegible] ठाकुराच्या घरावर दरोडा घालायला यापूर्वी एकदा साधु गेला होता.'

'हो.'

'त्याचं काय झालं ते माहीत नाही तुला ?' जसवंतसिगाचा आवाज आता बदलला होता, 'साधु तुझ्यापेक्षा हुशार होता हे तूही मान्य करशील. पण त्याला शेपूट घालून आणि चार सहकाऱ्याना गमावून परत यावे लागले होते ?'

बराच वेळ तो काही बोलला नाही. भाईचे तर तोंडच बंद झाले होते.

'भाई, चांगली माणसे गेली. आता तू आणि बाज्या फक्त त्यातले शिल्लक आहात. सांगकामे कितीतरी मिळतील. पण तुमच्यासारखी माणसे मिळणार नाहीत. फार सांभाळून मला तुमच्यावर यापुढे कामगिरी सोपवावी लागेल.'

'माफ करा मालक मला.'

'माफी कसली. तुला राग आला हे मलाही बरं वाटलं. अरे, जिवंत रक्ताचं लक्षण आहे ते. पण उगाच गैरसमज करून भडकू नकोस. ही टोळी चांगली मजबूत बनवायची आहे मला. भोला पांचाल यशस्वी होऊन आला तर एक चांगला माणूस आपल्याला मिळेल. त्यालाही तुम्ही जपलं पाहिजे. नाही आला तर फारसे नुकसान होणार नाही. फक्त चार माणसे हातची जातील. त्यानाही फारशी किंमत नाही.' जसवंतसिग समजुतीच्या सुरात सांगत होता.

भाई मान खाली घालून तिथून निघून गेला.

नेमका त्याचवेळी भोला पांचाल चार घोडेस्वारांसह दतियाच्या दक्षिणे-कडे असलेल्या जंगलात पोचला होता आणि आपल्या जोडीदारांकडून पुढची

माहिती घेत होता. कारण, त्या भागाची भोला उर्फ उदयला फारशी माहिती नव्हती.

तो उभा होता तिथून दतिया गाव फक्त एका कोसावर होते. बरीच रात्र झाली की दौडत तो गावात शिरणार होता आणि आपले काम साधून परत येणार होता.

पण त्याच्या मनात वेगळेच विचार घोळत होते.

जसवंतसिंगच्या टोळीत एकूण तीस माणसे होती. चार दिवसांपूर्वीच त्याने सातआठ माणसे कुठूनतरी मिळवली होती. ती सर्वजण एका टोळीत होती. त्यांचा सरदार घोड्यावरून पडून गंभीर जखमी झाल्यानंतर ती जसवंतसिंगला मिळाली होती.

अतिशय युक्तीने जसवंतच्या माणसांची संख्या कमी करायला हवी होती.

त्याच्या मनात आणखीही विचार येत होता. दतिया आले की चौघानाही पोलिसांच्या हवाली करावे आणि फौज घेऊन जसवंतकडे जावे. सर्व रस्ते त्याला आता माहित झाले होते.

अखेर तोही विचार त्यानें मनातून काढून टाकला.

जसवंत भोळा नव्हता. ही कामगिरी त्याने आपली परीक्षा पाहण्यासाठी आपल्या अंगावर टाकली आहे हे तो ओळखून होता. आपण पोलिसांना घेऊन गेलो तर...तर लगेच ती गोष्ट त्याच्या लक्षात येणार होती आणि तो सरळ सरळ सामना द्यायला तयार होता.

वेळ पडलीच तर तो कुठेही पळून जाऊ शकत होता. सर्व रान त्याचे होते. दऱ्या त्याच्या होत्या आणि नदी, नाले जसवंतला तोंडपाठ होते. कारण, सर्व भाग त्याने पायदळी तुडवला होता.

तोही विचार त्याने मनातून काढून टाकला. आणि स्वतःच अगदी युक्तीने काम साधावे असे त्याला वाटत होते. दतिया गावात शिरला तरी तो विचारच करीत होता. अजून मनाचा पक्का निश्चय झाला नव्हता.

गाव आले. बिनधडक दौडत तो गावात शिरला आणि त्याच्या मनाने निर्णय घेतला, सरळ दरोडा घालायचा. तुफान दौड करीत तो सरळ पन्ना-लाल ठाकुरच्या घरामागे आला आणि तिघानाही बंदुकांचे आवाज करायला सांगून तो सरळ मागच्या भागातून घरात शिरला.

त्याचे नशीब जोरावर होते. कुणीतरी त्यावेळी बाहेर आला होता आणि उदयला दार मोकळे सापडले होते. बंदुकीचा दस्ता डोक्यात बसताच हालचाल न करता तो म्हातारा खाली आपटला होता.

पण लगेच घरातून काही न करता तो बाहेर आला आणि घोड्यावर बसला. फक्त ठाकुरच्या घरातील सोन्याची फुलदाणी त्याने हातात घेतली होती.

तो घोड्यावर स्वार झाला तरी चौघेही हवेत गोळ्या झाडीत होते. उदय ऊर्फ भोला पांचालने फक्त चार गोळ्या झाडल्या आणि तो वाऱ्याच्या वेगाने दौडत निघाला व दुसऱ्या रस्त्याने रानात प्रवेश केला.

प्रथम तो घरात शिरला आपण हा दरोडा घातलाच या कल्पनेने. पण तो दरोडा घालताना त्याला चारपाच जणांवर तरी गोळ्या घालाव्या लागणार होत्या. तेच तर त्याला नको होते. फक्त एक देव्हाऱ्यासमोरची फुलदाणी मात्र त्याने उचलली होती.

कारण, जसवंतसिंगने याच फुलदाणीचे वर्णन केले होते. फार पुरातन होती ती आणि ठाकुरच्या घराचे एक वैभव म्हणून ती फुलदाणी घरात ठेवण्यात आली होती. सहजरीत्या बोलता बोलता समजलेली ही गोष्ट नेमकी उदयने लक्षात ठेवली होती.

पण त्याने मागे फिरताना जसवंतच्या चौघांनाही गोळ्या घातल्या होत्या. चौघे तरी कमी झाले होते आणि वर उदयचा भावही वाढला होता.

–आणि नेमकी हीच त्याची चूक झाली होती. हा जसवंत किती धोरणी आणि विचारी आहे याची कल्पना उदयला नव्हती. ती असती तर त्याने चौघाना ठार करून एकट्याने जाण्याचे धाडस केले नसते.

जसवंतच्या तळाकडे जाताना तो फारशी घाई करीत नव्हता. तरीही कोंबडा आरवण्याच्या सुमाराला त्याने तळावर प्रवेश केला. सर्वजण जागेच होते, भोला पांचालची वाट पहात.

'आलास ?' त्याच्याकडे पहात जसवंतसिंग बोलला. त्याची नजर आपली चार माणसे शोधीत होती.

'आलो ! चार माणसे गमावून आलो.' उदय दुःखाने कळवळून बोलला.

'म्हणजे ?'

'भयंकर प्रतिकार झाला आम्हाला. त्या घरात उत्कृष्ट दर्जाचे निशाण-बाज लोक आहेत. पण नीट लढता आलं असतं तर आम्ही सर्वजण परत आलो असतो.'

'म्हणजे?'

'तुमची माणसे एकदमच कच्ची होती. बंदुकीतून फक्त त्याना गोळया सोडता येतात. लढता येत नाही अशी माणसं काय कामाची?' उदय जरा रागावला होता. जसवंत मात्र शांत होता.

'भोला...हेच अपयश घेऊन साधु आला होता. माझा एके काळचा उजवा हात.'

'पण मी अपयश घेऊन आलो नाही.'

'काय?'

'हो. मी अपयश आणलं नाही.' घोडयाच्या पाठीवरच्या थैलीतून फुल-दाणी बाहेर काढीत उदय म्हणाला. त्याच्या चेहेऱ्यावर समाधान झळकत होते.

'फुलदाणी?'

'हो.'

'तू घरात शिरला होतास?'

'हो.'

'मग? तुझ्यावर का नाही झाला गोळीबार.'

'झाला. पण मी चुकवला.'

'नीट सांग भोला...तू कोण आहेस?'

'मला नाही समजलं?'

'चौघे ठार झाले. पण तू घरात शिरूनही तुझ्यावर गोळीबार झाला नाही. कुणालाही पटणार नाही हे. नीट सांगितलं नाहीस तर धावत्या घोडयाच्या मागे बांधीन.'

'मालक.'

'बोल–'

'बंदुक घ्या आणि माझ्योवर गोळया घाला.'

'का?'

'आपली खात्री होण्यासाठी.'

'मेल्यानंतर तू माझी कशी काय खात्री करणार आहेस ?'

'मी मरणार नाही.'

'माझ्या गोळीने मेला नाही असा माणूस अजून तरी जिवंत सापडणार नाही.' जसवंतसिंग क्रोधाने थरथरत म्हणाला.

'तरीही तुम्ही खात्री करा.'

'करीन, खात्री जरूर करीन.' भाईला खूण करून तो म्हणाला. 'खात्री होईल ती तुझ्या बदमाषीची.'

भाईकडची बंदुक त्याने हाती घेतली होती.

आता भोला आपल्या घोड्यावर बसला होता. जसवंत गोळ्या झाडील त्याकडे त्याचे लक्ष होते.

'एक.. दोन ..तीन...चार'

जसवंतसिंगाने फक्त चार गोळ्या झाडल्या. भोला फक्त हसत होता. त्याच्या घोड्याने वाकडी तिकडी हालचाल केली होती आणि गोळ्या चुकल्या होत्या.

जसवंतने बंदुक भाईकडे भिरकावली.

'भोला...तू परीक्षेत उतरलास.'

'खात्री होती मालक. मिठाला जागणारे रक्त आहे हे. हरामी माझ्याच्याने होणार नाही. स्वतःची काळजी घेता आली असती तर चौघेही आज परत आले असते. एकदम दारात जाऊन उभे राहिले. ठाकुराच्या घरचे बंदुकधारी काही बोळचाने दूध पीत नाहीत.'

उदय विश्रांतीसाठी गेला तरी जसवंतसिंग बेचैन होता. त्याच्या मनात वादळ चालले होते. जगातले एक आश्चर्य तो पहात होता. स्वतःच्या निशाणबाजीची नाही म्हटले तरी त्याला मेंड होती.

ती क्षणात उतरली होती. चार गोळ्या, त्याही नेम धरून झाडलेल्या भोला पांचालने चुकवल्या होत्या. काही तरी भयंकर शक्ती त्याच्या पाठीशी उभी असावी.

जसजसा तो विचार करू लागला तसतसे त्याच्या डोळ्यांपुढे एक चित्र उभे राहिले.

तो व्यापारी. प्रथम त्याच्या तीन माणसांना त्याने वाटेत ठार केले. एकाला बेपत्ता करण्यात आले. नंतर चौघे गेले. साधु स्वतः होता त्यात. अतिशय शूर आणि निशाणबाज असा साधू ठार झाला होता. त्यानेही गोळीबार केला असेल...

–आणि लगेच एक तरुण भोला पांचाल नांव सांगून त्याच्याकडे आला होता.

भोला पांचाल ! नांवही चमत्कारिकच होते.

त्याची कसून तपासणी करावी काय ? का आणखी एकादी कामगिरी त्याच्यावर सोपवावी ?

बराच वेळ त्याच्या मनात संघर्ष चालू होता. परीक्षा घ्यायची तरी कशी ? इतका विचार करण्यापेक्षा त्याला सरळ ठार का करू नये ? ठार करावे असाही विचार त्याच्या मनात उभा राहिला. पण एका हातात नशिबाने का होईना चांगला मिळालेला माणूस गमवायची त्याची तयारी नव्हती.

○ ○ ○

पहाटेला तळावर आलेला भोला पांचाल लोळत पडला होता. आपण फारच दमलेलो आहोत असे तो भासवीत होता. जसवंतची चार माणसं का होईना आपण लोळवली याच गमजात तो होता.

जसवंतसिंगाच्या मनातील संघर्षाची त्याला कल्पना येणे शक्य नव्हते. आपण त्याचे पूर्णपणे समाधान केलेलं आहे असेच तो मानीत होता.

–आणि नेमकी हीच चूक त्याने केली होती.

'भोला...मालक बोलावतात.' भाई दोन्ही हात कंबरेवर टेकून उभा होता. काहीतरी खास असावे असे भोलाला वाटले.

काय काम आहे हे विचारण्याची गरज नव्हती. कारण, काही महत्वाचे काम असल्याशिवाय जसवंतने त्याला बोलावले नसते. तो भाईच्या मागून निघाला.

'भोला, बैस.'

भोला बसला. भाई निघून गेला. जसवंतनेच त्याला हाताने खूण केली होती.

'आज दतियाला जायचं.'

'ताबडतोब त्यांच गावात दरोडा घालायचा !'

'हो.'

'पण...'

'घाबरलास ?'

'नाही.'

'मग ?'

'तिथले पोलिस सावध असतील. माणसेही सावध असतील.' भोला विचार करीत म्हणाला.

'तुला चार चांगली माणसं देईन. तू जा. आणि चार माणसे खरोखरच ठार झाली की काय ते पाहून ये.'

'मग त्याला वेश पालटून जावे लागेल.'

'जा. व्यापाऱ्याच्या वेशात जा.'

'आपण म्हणाल तसे–' भोलाने मान डोलावित म्हटले.

धावपळ सुरू झाली. भोलाची तो आता कसून पारख करणार होता. आपण अशी संधी त्याला देतो ही चूक तर करीत नाही ना ? अशीही शंका त्यावेळी त्याच्या मनात येत होती.

पण उतावळेपणा करणे हे त्याच्या स्वभावात नव्हते. त्यामुळे फायदा तर काही झालाच नसता. झालाच तर तो तोटा होणार होता. भोलाला सहजा-सहजी गमवायची त्याची तयारी नव्हती.

'कपडे वगैरे हवेत.'

'ते तू ठरव. मी भाईला सांगतो...चौघाना तुझ्या स्वाधीन कर म्हणून.'

'ठीक आहे. मी जाऊ ?'

'हो. सूर्य मावळण्यापूर्वी तयारी कर.'

'ताबडतोब तयार होतो मालक.' उठून जाताजाता भोला म्हणाला.

तो निघून गेला तरी जसवंत भारावल्याप्रमाणे त्या दिशेला पहात होता. या माणसाने आपल्यावर कोणती जादु केलेली आहे याचा तो विचार करीत होता.

कारण, भोलाला तो जपण्याचा प्रयत्न करीत होता.

: ६ :

सवात अधिक खळबळ माजली होती ती पोलिसखात्यात. लग्नाचे सबंध वऱ्हाड कापले अशी बातमी सर्वत्र पसरली होती.

卐 आणि लगेच चार आठ दिवसात दतियामध्ये ठाकुराच्या घरावर दरोडा पडला होता.

दतियाच्या पोलिसानाही शंकाच होती. ठाकुराच्या घरातील माणसानी एकही गोळी झाडली नव्हती. दुसरा आणखी कुणीही गावातील बंदुकधारी धावून आला नव्हता. पण दरोडेखोर ठार झाले कसे ?

गावात हीच चर्चा चालू होती.

कॅप्टन केनेडी हा नुकताच भारतात आला होता आणि त्याचा मुक्काम जयपूरला होता. त्याच्याही कानी ही भयानक दरोड्याची बातमी पोचली होती.

केनेडी हा अमेरिकेहून आलेला. पण त्याचे सर्व आयुष्यच इंग्लंडमध्ये गेले होते. ग्लासगो शहरात त्याचे आयुष्य गेले होते. तो इंग्लंडचा नागरिक बनला होता आणि इंग्लंडच्या फौजेत अधिकारी बनला.

तो खूप शिकलेला होता. पण त्याला साहसाची आवड होती. शिकारीला गेला की त्याला कोणाची गरज भासत नव्हती. शिकार हेच त्याचे व्यसन होते. शिवाय, तो अतिशय हुशार होता. एकाद्याला गोड बोलून कसे फशी पाडावे ही कला त्याला चांगलीच अवगत झाली होती आणि म्हणूनच जयपूरला राजधानीत पाठविण्यात आले होते.

त्याच्या मनात आले, दरोडेखोर ही काय चीज आहे हे तरी पहावे. कारण, त्याला बऱ्याचजणाकडून या दरोडेखोरांची परंपरा ऐकू येत होती.

अखेर परंपरा म्हणजे काय ? अशी रानटी परंपरा टिकविणे अतिशय धोक्याचे होते. काही झाले तरी ती मोडलीच पाहिजे असा विचार करून त्याने सरकार दरबारी आपला अर्ज रुजू केला आणि लगेच त्याला परवानगी देण्यात आली.

झाले... मिलिटरीचाच माणूस तो. त्याने दहा निवडक सैनिक बरोबर घेतले. त्यातील प्रत्येकाने लहानमोठ्या युद्धात भाग घेतला होता इतकेच नव्हे तर पराक्रमही गाजवला होता.

चंबळेच्या खोऱ्यातील कोनाकोपऱ्याची माहिती असलेले पोलिस खात्यातील दोन शिपाईही त्याने बरोबर घेतले आणि तो कामगिरीवर निघाला.

मजल दरमजल करीत तो चंबळा नदी ओलांडून मोरेनाला आला होता. भिंड आणि दतिया भागात सिंद नदीच्या खोऱ्यातही बरेच दरोडे पडतात हे त्याने ऐकले होते. सरळ त्या भागात शिरण्याचा त्याचा उद्देश होता.

दरोडेखोर रानावनात मुक्काम करून असतात हे मानायला तो तयार नव्हता. ते दिवसा गावात कुठेतरी लपलेले असतात आणि रात्री सरळ दरोड्याचे आपले काम पार पाडतात अशी त्याची समजूत होती. पण ती पक्की. याच भागातील गावांना चाळण लावण्याचा त्याने विचार केला होता.

मोरेनाहून सिंद नदी ओलांडून तो दतिया गावात आला आणि लगेच त्याला दरोडा पडल्याची बातमी मिळाली. लगेच तो घटनास्थळी रवाना झाला. पन्नालाल ठाकुरांच्या चारही मुलांना प्रश्न विचारीत तो पहाणी करीत होता. त्याने प्रेतांचीही पाहणी केली होती.

'गावातील कुणीतरी यांच्यावर गोळ्या घातल्या असतील.' केनेडी विचार करीत म्हणाला.

'नाही साहेब, कुणीही गोळी झाडलेली नाही.'

'गावात पिस्तुले वापरणारे किती जण आहेत ?'

'अंऽहं.'

' मग ही काहीतरी वेगळी भानगड आहे. या गोळ्या पिस्तुलातील आहेत. कदाचित एकदम कुणीतरी दोन टोळ्यानी दरोडा घातला असावा. दुसऱ्या–टोळीतील कुणीतरी दरोडेखोराने याना ठार केलं असेल. ' केनेडी शांतपणे म्हणाला.

त्याला शक्यता वाटत होती.

' गावातले कोण याना ओळखतो ?'

' नाही साहेब, पोलिसानी तीहि चौकशी केली. ' ठाकुराचा एक मुलगा म्हणाला.

' कुठल्या भागातून आले ?'

' दक्षिणेकडच्या. '

' नक्की ?'

' हो. '

आणखी तो थांबला नाही. लगेच त्याने झाशीकडे कूच केले. कारण, लग्नाच्या वऱ्हाडावर दरोडा पडला होता ती माणसे झाशीची होती. दरोडा पडला होता झाशी आणि ग्वाल्हेरच्या मध्ये. त्याच भागाची तपासणी करणे त्याच्या दृष्टीने योग्य ठरणार होते.

केनेडी झाशीत आला तेव्हा बरीच रात्र झाली होती.

० ० ०

त्याचवेळी रात्रीच्या भयाण अंधाराला चिरीत एक घोडेस्वार दतियाहून निघाला होता. तो कुठेही न अडखळता चालला होता. त्याला सर्व भागाची चांगली माहिती असावी आणि कुठे जायचे तेही त्याला माहित असावे.

तो भरवेगाने घोडा पिटाळीत जसवंतसिंगच्या तळावर आला. तो दतियाचा राहणारा जसवंतचा खबऱ्या होता.

' काय झालं रंगा ?'

' मालक, तुम्ही दतियाला ठाकुरावर दरोडा घालायला माणसे पाठवली होती ?'

' हो. '

' चौघेजण ठार झालेले आहेत. मी त्याना लगेच ओळखलं. पण त्यानी चोरलेली फुलदाणी काही सापडली नाही.' तो धापा टाकीत म्हणाला.

' माझ्याकडे आहे. '

' तुमच्याकडे ?'

' हो. '

' पण माणसे तर सर्व ठार झाली. चारीच्या चार. '

' नाही. एक परत आला. '

' मालक... चौघे मेले. त्यात काहीतरी घोटाळा आहे.'

' कसला ? हे बघ रंगा... नीट काय ते सांग--' जसवंत दरडावून म्हणाला.

' गावातील कुणीही त्यांच्यावर गोळ्या घातल्या नाहीत. '

' मग ? स्वतःहून गोळ्या झाडून घेतल्या ? '

' त्याना पिस्तुलाने ठार करण्यात आलेलं आहे. '

' पिस्तुल ?'

' हो. '

' ठाकुराच्या माणसांजवळ पिस्तुल नाही !'

' नाही मालक. शिवाय, ठाकुराच्या घरातून एकही गोळी झाडण्यात आलेली नाही. त्यावेळी घरात फक्त एक म्हातारा तेवढा होता. बाकीचे नाच पहायला गेले होते. ' रंगा घाईघाईने बोलला.

' रंगा, तुझी खात्री आहे ?'

' हो मालक. म्हणूनच तर सर्व माहिती काढून धावत आलो. चौघानाही पिस्तुलाने ठार मारलेलं आहे. सर्वांना आश्चर्याचा धक्का बसलेला आहे. '

' ठीक आहे... तू जा आता. '

' मालक, कॅप्टन केनेडी नावाचा युरोपियन मिलिटरीचे लोक घेऊन आलेला आहे. आज रात्री त्याचा मुक्काम झाशीत आहे. ' रंगाने विषय बदलला.

' का ?' जसवंत उद्गारला.

' दरोडेखोरांच्या मागे लागण्यासाठी.'

' किती माणसं आहेत ?'

' बारा. '

' आणखी काही ?'

'अंऽहं.'

'आता जाणार का सकाळी जाणार ?'

'आताच जातो मालक. उद्या तो या रानात शिरला तर गाठ पडायची.'

जसवंतसिंगने दिलेली थैली कंबरेला खोवून तो सरळ घोड्यावर स्वार झाला आणि काळोखात नाहीसा झाला.

पहाट झाली तरी जसवंतसिंगचा डोळा लागला नाही. त्याने भल्या पहाटे भाईला बोलावले. भाई डोळे चोळीत घाईघाईने आला.

'भाई, काहीतरी चमत्कारिक घडत आहे. आपण सावध रहायला हवं.'

'काय झालं ?'

'रंगा आला होता. कुणीतरी मिलिटरीचा कॅप्टन दरोडेखोरांच्या मागावर आहे. तो रात्री झाशीत पोचला अशी बातमी आहे.'

'इथं कसा येईल तो ?'

'काय असतं भाई, ग्रह फिरले की ते आपोआप इथंच येऊन पोचतील. काय सांगावा नेम ? तेव्हा यापुढे जसवंतसिंग मेला.'

'बोलता काय मालक ? आधी आम्हाला गोळ्या घाला.'

'नाही. आपण सर्वजण मेलो. आता या पुढे आपण वेगळ्या तऱ्हने वाग. अतिशय सावधगिरीनं. पण त्याआधी भोला यायला हवा.'

'तो एव्हाना यायला हवा होता मालक.'

'हो.' जसवंत होकारला. त्याला भाईकडे बरेच बोलायचे होते. पण त्याने ते टाळले. आपल्या मनातली शंका पडताळून पाहिल्याशिवाय काहीच बोलायचे नाही असे त्याने ठरवले होते.

'मालक, आपण भोला आला की जागा बदलायची ?'

'याहून मोक्याची आणि सुरक्षित जागा दुसरी आहे ?'

'नाही.'

'मग झालं ! इथचं राह्यचं. अशा गुहा आपल्याला मिळायच्या नाहीत. भोला आला की मला त्याच्याशी जरा बोलायचं आहे. मात्र तू एक काम कर. कुणालाही या बाजूला फिरकू देऊ नकोस.'

भाई गेला आणि बऱ्याच वेळाने भोला आला. तो एकटाच होता.

'काय झालं भोला ?'

‘ चौघेही ठार झालेले आहेत. ’

‘ आणि आज मेलेले ? ’

‘ त्यांचंच सांगतो मी. दतियाचा दक्षिण भाग पोलीस पार्टीने घेरलेला आहे. आम्ही गेलो आणि चारी बाजूनी लगेच वेढण्यात आलं . ’

‘ मग ? ’

‘ मी पळालो. ’

‘ कसा ? ’

‘ गोळ्या झाडीत. एकाचवेळी मी सहा गोळ्यानी सहा पोलिसाना जखमी केलं.’

‘ एकाच वेळी ?’

‘ हो. पिस्तुलाने. माझ्या टोपीत नेहमी पिस्तुल असतं.’ काढून दाखवीत भोला पांचाल म्हणाला.

–आणि नेमका इथेच घसरला.

जसवंतसिंग गंभीरपणे विचार करीत होता. स्पष्ट चित्र आता त्याच्या डोळ्यांपुढे उभे होते. पिस्तुलाच्या गोळ्यानी त्याची माणसे ठार झाली होती. ती आपली दुसऱ्याने कुणी ठार केली नव्हती, याचाच अर्थ भोला पांचाल कोणतातरी भयंकर डाव आपल्याबरोबर खेळत असावा असा त्याला संशय आला होता.

पण त्याने चेहेऱ्यावर तसे दर्शविले नाही.

‘ हे बघ भोला, झालं ते झालं आता आणि सात आठ दिवस तरी कोणतीच हालचाल करायची नाही. आरामात दिवस घालवायचे. जा तू विश्रांती घे.’

पिस्तुल हॅटमध्ये घालून तो निघून गेला आणि जसवंत भयंकर चिडला. त्याचा चेहेरा क्रुद्ध झाला होता. बंदुक उचलून त्याला ठार करणे शक्य नाही असे त्याला वाटत होते. त्याला एकदम ठार करणेही चांगले नाही असे जसवंतला वाटत होते.

कारण, त्याने आपल्या माणसांच्या तळाची माहिती जर आणखी कुणाला दिली असली तर भलताच प्रसंग उद्भवण्याची भीति होती. तो कोण, कुणाचे काम करतो हे जर समजले तर बाकीचे सोपे जाणार होते.

'भाई, आजुबाजूला कुणी नाही ना?'

'नाही.'

'भोला कुठं आहे?'

'तो घोरण्याच्यां तयारीत आहे.'

'त्याच्यावर झडप घाल. त्याला पत्ता लागता कामा नये आणि संधीही मिळता कामा नये'

'सरळ गोळी घातली तर?'

'नाही. तो मला जिवंत पाहिजे. मेला तर उलट माझी पंचाईत होईल. आपल्या आठ माणसाना त्यानं ठार केलेलं आहे. संधी मिळाली तर तो तुला आणि मलाही ठार करील. त्याला मोकळा सोडता कामा नये.'

'पण मालक, पिडा मागे जिवंत ठेवा तरी कशाला?' भाई जरा नाराजीनेच म्हणाला. त्याला हे पटत नव्हते.

'मला त्याच्याबरोबर बोलायचं आहे.'

'काय करू पकडून?'

'हात मागे घेऊन नीट बांध. त्याच्या हॅटमध्ये पिस्तुल आहे. त्याकडे नीट लक्ष दे क्षणाची संधी त्याला दिलीस तर तो तुझा फडशा पाडील'

भाई निघाला. सुन्न झाला होता तो. जसवंतला तो चांगलं ओळखत होता तो भलताच ग्रह करून घेऊन घाईघाईने काहीच बोलत नव्हता. कशाने तरी त्याची खात्री झालेली आहे हे भाईच्या ध्यानात आले.

त्याने आणखी दोघाना घेतले आणि तो भोला झोपला होता तिथे गेला. काम फारसे अवघड नव्हते. खडबडून जागा झालेल्या भोला पांचालला फारशी गडबड करायला मिळालीच नाही.

हातपाय बांधून त्याला त्याच्याच जागेवर टाकल्यानंतर तिघेही निघून गेले. पहाऱ्याची गरज नव्हती. कारण, सर्वजण त्यांचीच माणसे होती.

सकाळ झाली होती. सूर्य वर आला होता आणि जसवंतसिंग भोलाचाच विचार करीत होता. असा माणूस पोलिसखात्यात असणे शक्य नाही अशी त्याची ठाम समजूत झाली होती. आपल्याहूनही तो शूर आहे हे जसवंत स्वतःहूनच कबूल करीत होता. आणि आता त्याचे काम करावे हे ठरवीत

होता, पण त्याआधी त्याला काल नेलेली माणसे कुठे मारून टाकली याचा छडा लावायचा होता.

लगेच त्याने हुकूम सोडला. भाईला मात्र त्याने पाठवले नाही. तिघा-तिघांच्या चार तुकड्या त्याने चार दिशाना सोडल्या.

‘ जा. भोलाबरोबर काल दतियाला जाण्यासाठो निघालेले कुठे आहेत हे शोधून काढा. नाही सापडले तरी तुम्ही सूर्य मावळताच परत जा.’

चार तुकड्या निघाल्या. चौघाना शोधण्यासाठी.

—आणि भोला पांचाळ ऊर्फ उदयसिंह चौहान स्वतःच्या भवितव्याचा विचार करीत पडला होता. कारण, तो अतिशय धोकेबाज आणि घातकी दरोडेखोरांच्या हातात सापडला होता. शिवाय, त्याचे हातपाय बांधण्यात आले होते

त्याला हालचाल करायला जागाच शिल्लक उरली नव्हती.

: ७ :

卐

सैनिकाना दिले जाणारे शिक्षण जसवंतसिंग आणि त्याच्या माणसानीही घेतले होते. काही नवीन मंडळी सोडली तर इतर सर्वजण समोरासमोरच्या लढाईत मुरलेले होते. निदान तसे शिक्षण तरी त्यांना मिळाले होते.

कॅप्टन केनेडी झाशीहून त्या भागात येत आहे असे समजताच जसवंतसिंग घाबरला होता. आणि त्याहून अधिक चिडला होता. काही झाले तरी या गोऱ्या साहेबाला धडा शिकवायचा असे तो मनात ठरवीत होता.

तो आपली माणसे घेऊन आला तर कडेकपारीही तपासायला सुरू करील अशी त्याला भीति वाटत होती. शिवाय काही माणसे त्याने याच भागातील बरोबर घेतलेली आहेत हे समजताच तो गडबडून गेला होता.

भाई तर घाबरला होता. ही जागा सोडली तर मग लपायला अशी जागा त्याना शोधूनही सापडली नसती. तसा केनेडी रानात येऊन डोंगराच्या कपारीतील ती गुहेसारखी जागा शोधून काढू शकला नसता.

जर काढलीच तर ?

तर मग जसवंतसिंगच्या टोळीचे भविष्य त्याचक्षणी संपूर्ण होणार होते. पुढे कोणतीही हालचाल त्याना करायला मिळाली नसती. कारण, त्या कपारीला दुसरा मार्ग नव्हता.

शिवाय, धूर्त केनेडीसारख्या गोऱ्या अधिकाऱ्याशी गांठ पडल्यानंतर काय होईल याचे चित्रही उभे करायला भाईच काय तर खुद्द जसवंतही तयार नव्हता. इतके ते भयंकर वाटत होते त्याना.

जसवंतसिंगच्या टोळीने लग्नाच्या वऱ्हाडाला ज्या भागात गांठले होते त्या भागातून तो शोध घेत चालत होता. एक अतिशय हुशार असा शिकारी कुत्रा त्याच्या बरोबर होता. त्याला मेलेल्या एका दरोडेखोराचा वास देण्यात आला होता.

आणि आता ते सर्वजण कुत्रा जाईल तसे जात होते. पण कुत्रा गोंधळत होता. घोड्यावरून फिरणाऱ्या दरोडेखोरांचा वास काढणे त्याला तितकेसे जमत नव्हते. किंवा काहीतरी गडबड झाली असावी असा केनेडीचा ग्रह होता.

डोंगराच्या शेंड्यावरून झाडाआड दडून जसवंताची माणसे केनेडीची हालचाल निरखीत होती. तो डोंगर चढू लागला की आपल्याला कळवावे असे जसवंताने बजावले होते. डोळ्यात तेल घालून ती माणसे पाहणी करीत होती.

आणि जेव्हा केनेडीने डोंगराच्या पायथ्याकडच्या भयाण रानात प्रवेश केला तेव्हा पाहणी करणारे तिघेही घोडे पिटाळीत धावले आणि जसवंतसिंगच्या कानी त्यानी ती बातमी घातली.

जसवंत कितीही धीराचा असो पण घाबरला यात शंका नाही. जेव्हा तिघांनीही त्याचा मार्ग कसा होता हे सांगितले तेव्हा त्याने अंदाज केला की गोऱ्या साहेबाला काहीतरी वास लागला असावा.

त्याआधी काही मिनिटे त्याच्या तीन माणसानी एक खळबळ उडवून देणारी बातमी आणली होती. दतियाला जी चार माणसे दुसऱ्यावेळी भोला पांचाल घेऊन गेला होता, ती जवळच एका रानात पडली होती आणि रानटी जनावरानी त्यांचे लचके तोडले होते.

'मालक त्याना ओळखणे कठीण आहे.' एकजण अंगावर शहारे आणीत म्हणाला होता.

जसवंतच्या मनात आले, गोरा केनेडी या भागात आणि तोही सरळ आपल्या तळाच्या दिशेने येत आहे आणि तोही या भागाची संपूर्ण माहिती असल्यासारखा. भोला पांचालचा तर त्याच्याशी सबंध नाही.

त्याने सर्वांना तयारीत राहण्याचा हुकूम केला आणि तो हातात बंदुक

घेऊन भोला पांचालच्या जागेत शिरला. त्याला छोटयाशा कपारीत त्याने ठेवले होते.

काही झाले तरी जसवंत त्याला गोळी घालणारच होता. इतकी हराम-खोरी जसवंताने यापूर्वी पाहिली नव्हती आणि ऐकलीही नव्हती. आमचेच मीठ खाऊन आमच्याशीच हरामखोरी ? हे चालायचे नाही... जसवंत चालत चालता मनात म्हणत होता.

पांचालसारखी माणसे मिठाला थोडीच जागणार? शत्रु आहोत ना आम्ही ? शत्रूच्या मिठाला जागण्याइतका तो हराम कसा असेल ?

केनेडीने एक धक्का त्याला दिलेला. दुसरा धक्का दिला तो भोला पांचा-लने. भोला आपल्या जागेवर नव्हता. सकाळी जसवंतसिंगने त्याला खडसा-वून प्रश्न विचारले होते आणि दुपार वर यायच्या आत तो नाहीसा झाला होता. दोऱ्यांचे तुकडे इतस्ततः पडले होते.

जसवंतसिंगचे डोके सुन्न झाले, दरवेळी या भोला पांचालाने त्याला धक्का दिला होता. तो तळात शिरल्यापासून धक्के देत होता आणि आताचा हा धक्का तर सहन न करता येण्यासारखा.

अगदी हातोहात त्याच्या हातावर तुरी दिली गेली होती. या हाताचा पत्ता त्या हाताला नसताना.

भडकलेला जसवंतसिंग भोला पांचालला शोधण्याच्या भरीला पडला नाही. शोधण्यात काहीच अर्थ नव्हता. जो हातापायाना बांधलेल्या दोऱ्या तोडून जातो तो काही जवळच राहून मला पकडून पुन्हा बांधा म्हणणार नाही. आणि तो जवळ असलाच तरीहि आपल्या माणसाना दाद देणार नाही याचीहि खूणगाठ त्याने त्याचक्षणी बांधली होती. जसवंत तसा धोरणी होता...माणूसपारखी.

आता त्याने भोला पांचाल डोक्यातून काढला. धावत जाऊन तो आपल्या घोडयावर बसला. भाईने सर्व फौज तयार ठेवली होती.

'भाई, मी वरून हल्ला करतो–'

'मालक, समोरून हल्ला धोक्याचा आहे तो आम्ही करतो. तुम्ही बाजने करा.' भाई जोरात म्हणाला.त्याला स्वतःहून मालकाची काळजी अधिक होती.

'भाई, मी सांगतो तसंच झाले पाहिजे. एकेकाला कापून काढलं पाहिजे त्यातला कुणीहि परत जाता कामा नये. हे सगळे त्या भोला पांचालचे कर्म आहे ते उलटले पाहिजे !' जसवंत थरथरत म्हणाला.

त्याची पुढे समजूत घालण्याचे धैर्य भाईला झाले नाही.

'भाई, तू डाव्या बाजूने हल्ला कर. कुणालातरी उजव्या बाजूने पाठव. प्रत्येकाच्या वाट्याला नऊ माणसे येतात.'

भराभर जसवंतसिगने हुकूम सोडले. माणसे विभागली गेली आणि निघाले. भाईने डाव्या बाजूला हल्ला सुरू करताच तो गोळीबाराचा आवाज ऐकून लगेच उजव्या बाजूने हल्ला करायचा असे ठरवले होते.

त्याचवेळी जसवंतसिंग सरळ समोरून त्याच्यावर चालून जाणार होता.

कसा सुटतो केनेडी ते पाहूया ! भरधाव धावणाऱ्या घोड्यावरचा जसवंत म्हणत होता.

जसवंत शेंड्यावरच थांबला. त्याची सर्व माणसे मोक्याची जागा पाहून मोर्चे लावून बसली...कारण सर्वजण थोड्याचं अवकाशात जवळ पोचतील हा त्यांचा अंदाज होता. तो खराहि होता.

लढाईला तोंड लागले. भाईने चित्त्यासारखी त्यांच्या अंगावर झेप घेतली. गोळ्यांचा भडिमार सुरू झाला आणि नेमके त्याचवेळेला जसवंतसिंग खाली उतरू लागला.

कारण, दोन्ही दिशानी गोळीबार सुरू करीत भाई केनेडीच्या मागच्या बाजूला सरकत होता. त्याला डोंगर चढणे भाग होते. तो केव्हां डोंगर चढतो याची वाट पाहत जसवंतसिंग थांबला नाही.

जसवंतने केलेला मारा भयानक होता. कोंडीत सापडलेल्या सिंहासारख केनेडी चवताळला होता. मागे जावे तरी पंचाईत, पुढे तर अशक्य. दोन्ही बाजू पॅक ! – तो गोंधळला.

इतका भयानक मारा त्याने यापूर्वी पाहिला नव्हता. हल्लेखोर या कामात कसलेले आहेत ही एकच खूणगाठ त्याने बांधली. पण ती गाठ घेऊन आपण परत जाऊ शकू याची त्याला खात्री नव्हती.

त्याचवेळीं ते घडले.

अचानक एक गोळी त्याच्या पोटात शिरली. काय झाले हे समजण्यापूर्वीच दुसऱ्या गोळीने तो खाली आपटला. कोणतीहि हालचाल करण्यापलिकडे तो गेला होता. इतका शूर केनेडी पण फक्त दोन गोळयापुढे तो शरण गेला होता.

एकालाही माघारी वळू द्यायचे नाही हा जसवंतसिंगचा निर्धार. प्रेतेही कुणाला सापडू द्यायची नाही.

अकरा प्रेते !

' भाई, याना पुरून टाक. वास देखील लागता कामा नये कुणाला—' जसवंत ओरडून म्हणाला आणि फक्त दोन माणसाना घेऊन खाली उतरला. आणखी कुणी दडलेला नाही याची त्याला खात्री करायची होती. आणि भोला पांचाल सापडला तर त्यालाही पहायचे होते.

—पण तो सापडला नाही. भोला परत सापडण्यासाठी सुटून गेला नव्हता. आता पुन्हा गाठ पडेल तेव्हा भोला किंवा जसवंत जिवंत राहतील हेही तो ओळखून होता. म्हणूनच शोध बंद करून तो तळाकडे आला.

डोंगराच्या उतारावर प्रेते पुरण्याचे काम चालू होते.

० ० ०

आणि भोला पांचाल ?

—तो तर आरामात जसवंतसिंगच्या तळापासून जवळच दुसऱ्या डोंगरावरच्या एका झाडावर बसला होता.

जसवंताने बांधून त्याला डोंगराच्या कपारीत टाकले तेव्हा त्याने स्वत:बद्दलची आशाच सोडली होती. कितीही शांत स्वभावाचा विचारी असा असला तरी जसवंत आपणाला सोडणार नाही हे त्याने पक्के ओळखले होते.

भोला ऊर्फ उदय स्वत:लाच पडल्या पडल्या दोष देत होता. चार माणसे ठार कशी झाली ? तू कसा सुटलास ? या त्याच्या वाक्यानेच उदयनें सावध व्हायला हवे होते आणि दुसरी चार माणसे आपली परीक्षा पाहण्यासाठी बरोबर दिलेली आहेत हेही ओळखायला हवे होते.

एकदा केलेला मूर्खपणा कसा नडतो ते त्याने प्रत्यक्ष पाहिले होते. आपली इथून सुटका जसवंत एकाद्या गोळीने करील असे त्याला वाटत होते.

म्हणून काही गप्पच राहावे असे त्याच्या कुंडलीत लिहिले नव्हते. मरणच येणार असेल तर थोडी धडपड करायला काय हरकत होती. नंतर कायमचे शांत पडायचेच आहे असा त्याने विचार केला होता.

काहीतरी करून सुटण्याची धडपड करावी असा तो विचार करीत असतानाच जसवंत आला.

' भोला... कसं काय वाटतं ? '

' इतकं चांगलं यापूर्वी वाटलं नव्हतं. '

' हे बघ भोला, तू शूर आहेस हे मी नाकबूल करीत नाही. तुझ्यासारखा माणूस मला मिळाला तर मी ही सरदारकी सोडीन... अगदी खुषीने. '

' जसवंत, तुझ्याबद्दल एका दिवसात माझ्या मनात आदर निर्माण झाला होता तो एका क्षणात संपला. तू शूर आहेस अशी माझी कल्पना होती. तसा तू नाहीस. '

' हं सांग... पाठीत सुरी खुपसण्याचं काम माझा कुठलाही माणूस करणार नाही. '

' तसं मीही करीत नाही. '

' माझी आठ माणसं तू एकटयाने मारलीस. हे तू नाकबूल करतोस काय ? '

' मी कबूल करतो. '

' हेच मला पाहिजे होतं. ' जसवंत क्रोधाने म्हणाला, ' माझी कल्पना पहिल्यांदाच तशी झाली होती. नंतर पुन्हा मी चार माणसांचा जुगार खेळायला नको होता. '

' तो जुगार मी खेळायला नको होता जसवंत. त्याना घेऊन जाण्याऐवजी मी एकटा गेलो असतो तर काम फत्ते करून आलो असतो. निदान चांगली निशाणबाज माणसे तरी द्यायची होतीस ? ' भोला शांतपणे बोलत होता आणि आश्चर्याने जसवंत त्याच्या तोंडाकडे पहात होता. त्याचा क्रोध खर्रकन उतरला होता.

' म्हणजे, तुला काय म्हणायचंय ? '

' काही नाही. मी त्याना न्यायला नको होते. त्याना लढता येत नाही पोलिशांशी लढताना त्यानी थोडा समयसूचकपणा दाखवला असता तर पंधरासोळा जणाना लोळवून आम्ही परत आलो असतो. तुझी माणसं लौकर भितात. गोळीबार ऐकताच गांगरली ती. '

' तसं होणार नाही भोला. '

' तसंच झालं. '

' माझी शोधासाठी गेलेली माणसं आली की खरं काय ते कळेल. भोला, तू सांगतोस त्याची मला खात्री पटली तर... तर या जसवंतसिंगावर विश्वास ठेव, मी तुझ्या आज्ञा पाळायला सुरुवात करीत. ' जसवंत गंभीरपणे मनापासून बोलत होता.

' तितका दिलदारपणा तुझ्यात असता तर मी झोपेत असताना मला पकडून बांधण्यात आलं नसतं. तुम्ही भ्याड आहात सर्वजण. ' भोला तापून बोलला आणि जसवंतसिंग फक्त हंसला.

' भोला, मला कधी कधी माघार घ्यावी लागते. त्याला [illegible] म्हटलं तरी मला चालतं. शूराला कधीकधी प्रसंग पाहून भ्याड [illegible]. तू जर कोण आहेस हे एकाच शब्दात सांगितलंस तर माझा आणि तुझाही सर्व त्रास वाचेल. '

भोला काहीच बोलला नाही. जसवंतसिंगही फार वेळ थांबला नाही. कोणत्यावेळी त्याला बोलायला भाग पाडायचे हे जसवंतला माहित होते.

जसवंत जाताच भोलाने हालचाल करायला सुरुवात केली. फितवायचा प्रयत्न केला तर एकादा फितेल काय याचाच तो विचार करीत होता. कारण, हातापायाना बांधलेल्या दोऱ्या मजबूत आहेत हे त्याने अनेकवेळा पडताळून पाहिले होते.

शेवटी त्याने एक प्रयोग करण्याचे ठरवले. पाय बांधलेले असतानाच त्याने धडपडत उभे राहण्याचा प्रयत्न केला आणि तो साधलाही.

उभा राहिला...पुढे काय ? कपारीच्या बाहेर तर जाऊ शकत नव्हता शिवाय, कुणीतरी येईल आणि पाहिल असेही त्याला वाटत नव्हते. अजून फारशी उष्णताही भासत नव्हती.

कारण, सूर्योदय होऊन फारसा उशीर झाला नव्हता. नंतर कुठे त्याला आठवले. तुमानीच्या मागच्या बाजूला एका कप्प्यात एक छोटी सुरी आहे. कातडी म्यानातून ती काढणे फारसे कठीण नाही.

वाटणे वेगळे आणि घडणे वेगळे. खांदे वर आखडून घेऊन त्याने तुमानीच्या चिंचोळ्या खिशात बोटे घालण्याचा प्रयत्न केला. खिसा वाकडा होता. आतल्या वस्तु बाहेर पडू नये म्हणूम ती व्यवस्था करण्यात आली होती. तसा नेहमी हात मोकळे असतानाच आतली वस्तु काढणे कठीण होते. आता तर त्याचे हात बांधले होते.

अखेर बराच वेळ जोर करताच वाकडी मारलेली खिशाची शिलाई तुटून आली होती आणि सहजरीत्या त्याची बोटे आत शिरली होती. दोन बोटांनी त्याने सुरी बाहेर काढली तेव्हा त्याला ब्रह्मांड गवसल्याइतका आनंद झाला होता. काही झाले तरी आता निसटायचेच असा तो विचार करीत होता.

त्याने वाकून पायाच्या दोऱ्या कापण्याचा प्रयत्न केला. सुरीचे टोक पायातील दोऱ्यांपर्यंत पोचत होते. पण जोर करून दोऱ्या कापता येत नव्हत्या. नाना प्रकार त्याने करून पाहिले...पण छे: ! अखेरपर्यन्त त्याला ते जमले नाही.

शेवटी त्याने तो नाद सोडला. कारण खांदे, बोटे आणि कंबर मोडून जाण्याची वेळ आली होती.

निराश होऊन तो उभा राहिला. जाताना शांत वाटणारा जसवंतसिंग परत क्रोधाने थरथरत केव्हा येईल याची खात्री नव्हती. आता तो आला तर सरळ एका गोळीने काम संपवूनच जाणार होता.

एकदा शरीरात गोळी शिरल्यावर मग धडपड काय कामाची ?

धडपड सुरू केली की उपाय सुचतात. पाण्यात उडी घेतल्याशिवाय का पोहायला येणार आहे ? हा अनुभव तसा उदयला नवा होता. कधीकाळी कुणी आपल्याला बांधून घालून बंद करील असं कुणी त्याला सांगितले असते तर तोंडावर नसली तरी मागून...किंवा मनातल्या मनात त्याने सांगणाऱ्याची टर उडवली असती.

तो ताठ उभा राहिला. कपारीच्या भिंती खडबडीत होत्या. दोन्याही मजबूत होत्या. आयुष्याची भिस्त आता तो त्या कपारीवरील भिंतीवर ठेवणार होता. नशीब जोरात असले तर नक्की त्याला निर्जीव खडबडीत भिंती साथ देणार होत्या.

त्याने अंदाज घेतला. हाताच्या दोन्या भिंतीवर घासल्या तर कितपत दुखापत होईल हे त्याने पाहिले आणि एकदम जोर केला. घसाघसा तो हात घाशीत होता. वेदना होत होत्या. तोंड वेडंवाकडं करीत तो त्या सहन करीत होता.

आताच्या या वेदनांना तो घाबरला तर पुढे कधीच त्याला या वेदनांचा अनुभव घेता येणार नव्हता. त्या सहन करण्यापलिकडे तो जाणार होता.

सारे शरीर घामाघूम झाले. आणखी ताकद शिल्लक नाही असे त्याच्या मनाने त्याला बजावले. शरीर थकले आणि त्याच्या मनाने त्याला धीर दिला, ' आणखी थोडे. घाबरू नकोस. या श्रमाने मरणार नाहीस तू. हे श्रम घेतले नाहीस तर मात्र मरशील. '

तो थांबला. जोर करून दोरी कितपत घट्ट आहे हे पाहिले, आणि काय आश्चर्य ! फट् असा आवाज झाला. दोरीचे एक टोक तुटले होते.

नंतरचे सारे सोपे होते. हात मोकळे झाले तेव्हा त्याच्या अंगात उभे राहण्याची ताकद नव्हती.

हात मोकळे होताच त्याने प्रथम पायांच्या दोन्या कापल्या. नंतर थोडीही विश्रांती न घेता हॅटमध्ये असलेले पिस्तुल जाग्यावर आहे की नाही हे पाहिले. ते तसेच होते. खिशातील दोन्ही पिस्तुले तशीच होती. त्याची तपासणी झाली नव्हती.

भलत्याच आत्मविश्वासाने जसवंतसिंगने त्याला खोलीत कोंडून ठेवले होते. आणि लौकरच त्याला त्याचा पश्चात्ताप होणार होता.

आता कुणाच्या बापाची त्याला पर्वा नव्हती. पुढे येईल त्याला उडवायचा त्याने निश्चय केला होता.

दबकत दबकत तो बाहेर आला. जसवंताची सर्व माणसे विश्रांती घेत होती किंवा आपापल्या कामात गर्क होती. काही बाहेर होती, पण कुणाचेही लक्ष त्याच्या गुहेकडे नव्हते.

तो सटकला तेव्हा कुणीही पाहिले नाही.

सुटकेची आशा त्याने पूर्वी सोडली होती. पण आता तो पूर्णपणे मोकळा होता.

घोडा मिळविणे त्याला शक्य नव्हते. कावळ्यासारखे दरोडेखोर त्याच्या-वर तुटून पडले होते. त्याने एकाहून एक निशाणबाज माणसे त्या टोळीत पाहिली होती. तिघाचौघांशी लढणे आणि पंचवीस तीस माणसांशी लढणे यात जमीन अस्मानाचा फरक होता.

अतिशय सावधगिरीने तो डोंगराच्या पलिकडे जाण्याचा प्रयत्न करीत होता. नंतर त्याने सरळ उंच असे झाड गाठले आणि तीन फांद्यांच्या एका बेचक्यात स्वतःला अडकवून घेतले.

विश्रांतीला हे ठिकाण अतिशय चांगले होते.

झाडावर पडल्या पडल्याच त्याला डुलकी लागत होती. ती कशाने तरी भंग पावली. डोळे सताड उघडे झाले. भयंकर गोळीबाराचे आवाज तो ऐकत होता. खाली उतरून पहावे असे त्याला वाटले पण धीर झाला नाही. काहीतरी गडबड आहे हे मात्र त्याने ओळखले होते. कदाचित पोलिसांच्या तुकडीशीही जसवंतसिंगच्या माणसांची गाठ पडली असेल.

बराच वेळ गोळीबार चालू होता. तो थांबला तेव्हाही उदयला वाटले, खाली उतरून पहावे.

पण पुन्हा त्याच्या मनाने कडाडून विरोध केला. रात्र झाल्याशिवाय झाडावरून खाली उतरायचे नाही असे त्याने ठरविले होते.

: ८ :

卐

उदय झाशीला पोचला तेव्हा पहाट झाली होती. अख्खी रात्र तो चालत होता. पाय उचलण्याची त्याच्यात ताकद नव्हती. त्याला विश्रांती हवी होती. ती कुठे मिळेल हे त्याला माहित होते.

धर्मशाळेतील एका कोपऱ्यात त्याने अंग टाकले आणि लगेच त्याला डोळा लागला.

–आणि जागा झाला तेव्हा दुपार टळून गेली होती.

जवळच्या ओढ्यावर प्रथम त्याने स्नान आटपून घेतले. नंतर एका घरात जाऊन त्याने काही दशम्या विकत घेतल्या आणि ताजातवाना होऊन तो बाहेर पडला.

अंगावरचे मळलेले कपडे, भलीमोठी हॅट आणि बावळट चेहेरा हे ध्यान पाहून वाटेतला प्रत्येक माणूस त्याच्याकडे एकदा तरी वळून पहात होता. पण उदयला त्याची पर्वा नव्हती.

त्याचे कान लागले होते ते भयंकर बातमीकडे. झाशी गावात फक्त एकाच गोष्टीची चर्चा होत होती. कॅप्टन केनेडीचा दरोडेखोरांनी धुव्वा उडवला.

ते सांगायला केनेडीचा एकच माणूस जिवंत आला होता. तो घोडा झाडाला बांधून शेंड्यावरून आपल्या माणसांच्या हालचाली पहात होता. केनेडीला गोळी लागून पडलेला त्याने स्वतःच्या डोळ्यानी पाहिले आणि भरधाव घोडा पिटाळीत तो झाशीला आला.

—आणि शोधाला गेलेला पोलिसांच्या हाती त्यांचा घोडाही सापडला नाही. फक्त घनघोर युद्धाची त्याना कल्पना येऊन गेली होती. झाडाच्या खोडात ठिकठिकाणी गाड्या शिरल्या होत्या.

जसवंतसिंगची छाती मात्र जबरदस्त! फिरता फिरता उदय मनात म्हणत होता.

चालता चालताच त्याची नजर पोलिस स्टेशनवर गेली. प्रथम त्याला वाटले...सरळ निघून जावे पण नंतर त्याच्या मनाने दुसराच निर्णय घेतला. कोणताही विचार न करता तो सरळ पोलिस स्टेशनात शिरला.

'कोण पाहिजे ?' दारातच त्याला अडविण्यात आले.

'तुमचा साहेब.' मख्खपणे उदय बोलला.

'साहेब ? काय काम आहे ?'

'काम आहे साहेबाकडं...तुझ्याकडे नाही. तू आपला सरळ जाऊन मी काय सांगतो ते साहेबाना सांग.' उदय तडकला आणि हवालदार नरमला तरीही मिशीला पीळ देत तो ओरडलाच.

'इथं उभा रहा...मी विचारून येतो.'

'ये नाहीतर येऊ नकोस. मला फक्त साहेबाला भेटायचं आहे.' उदयने रागाने पहात म्हटले. सर्व आजुबाजूचे पोलिस ते ध्यान पाहून आपसात हसत होते.

उदयच्या मनात अजूनही चलबिचल चालू होती. आपण सारे सांगावे की सांगू नये अशा संभ्रमात तो पडला होता. सांगितले नाही तर तो एकट्याने जसवंतसिंगाशी सामना करू शकत नव्हता. समजा, सांगितले आणि साहेबाच्या गळ्यात उतरले तर उलट बरे होणार होते. पोलिसांची मदत तरी मिळणार होती.

हवालदार मिशीला पीळ भरीत बाहेर आला.

'चल आत.'

उदय काही बोलला नाही. तो सरळ आत शिरला. मागे हवालदार होताच. उदय आत शिरताच साहेब त्याच्याकडे आश्चर्याने पहातच राहिला.

तो गोरा नव्हता...शीख होता.

'काय काम आहे ते झटपट सांग आणि जा.' इन्स्पेक्टर त्याच्यावर खेकसला.

'झटपट ?' तोंड वेडेवाकडे करीत उदयने म्हटले.

'मग काय दिवसभर सांगणार आहेस ?'

'काय ?'

'गेट आऊट–' साहेब भडकला आणि उदय हंसला. साहेबाचा पारा तो एका शब्दात खर्रकन् उतरू शकला असता. पण आवर घातला जिभेला.

'फार काम आहे काय साहेब ?' उदय सरळ खुर्ची घेऊन त्याच्यासमोर बसला आणि तो साहेब उखडला. तो लालबुंद झाला होता. पिस्तुल काढावे आणि या उर्मट पोराला सरळ गोळी घालावी असाही विचार त्याच्या मनात आला असावा.

'हवालदार, याच्या बखोटीला धरून खिडकीतून बाहेर फेक.' तो ओरडला आणि हवालदार पुढे सरकला.

'इन्स्पेक्टर, जरा तुमचा हुद्दा सांभाळून बोला. भीक मागण्यासाठी आलो नाही...भीक घालण्यासाठी आलोय.' उदयच्या रागाचा पारा एका-एकी वर चढला आणि हवालदाराचे पुढचे पाऊल जाग्यावरच राहिले.

हा प्रकार दोघानाही नवा होता. एक अव्यवस्थित, घाणेरड्या कपड्यातील बावळट तरुण इन्स्पेक्टरला काय भीक घालणार होता ? काय करावे काय बोलावे हेच त्या साहेबाला समजले नाही.

'पाच मिनिटात काय ते सांग.'

'दोन तास लागतील. ऐकायचं नसेल तर मी जातो. पोलिसखात्यानं कधी माझ्यावर उपकार केलेले नाहीत. फारच शूर असाल तर जसवंतसिंग दरोडेखोराच्या मागे का लागत नाही ?' उदयचा आवाज वरच्या पट्टीत होता. काय होईल ते होवो, या साहेबाला जिरवायचा चंग त्याने बांधला होता.

'जसवंतसिंगची तुला काय माहिती ?'

'सध्या माझा सामना त्याच्याशी चालू आहे. कालच मी त्याच्या कैदेतून सुटलो.' उदय शांत होत म्हणाला, 'पण ते तुम्हाला सांगण्यात अर्थ नाही.

फार कामाची माणसं तुम्ही. मी ग्वाल्हेरला जाईन. पीटर क्लेम माझं नीट ऐकून तरी घेईल.'

'तू त्याला ओळखतोस ?'

'चांगला.'

'तुझं नांव काय ?'

'उदयसिंह चौहान. चौरंगीचा. धौलपूर जिल्हा.' काही समजायला अड-चण येऊ नये म्हणून त्याने स्पष्ट शब्दात सांगितले.

'उदयसिंह चौहान ?' आश्चर्यानें त्याच्याकडे पहात इन्स्पेक्टर उद्गारला' 'मी हे नांव ऐकलेलं आहे.'

'हो. करौलीला फौजदार होता तुम्ही.'

'पुढं ?'

'भूपाल दरोडेखोराच्या प्रकरणात तुम्ही मला पाहिलं.मी तुम्हाला पाहिलं माझा आणि माझ्या भावाचा धौलपूरला सत्कार झाला तेव्हा तुम्ही होता.'

आता कुठे त्याच्या जाड केसांतून डोक्यात शिरले होते.तो खूष झाला होता.

'हवालदार, हे पहा, आमच्या घरी जाऊन सांग, रात्री मुक्कामाला एक पाहुणा आहे. खोली तयार ठेवायची.'

हवालदार सलाम ठोकून गेला. साहेब पाघळला आणि या बावळट तरुणाला आपल्या घरी पाहुणा म्हणून नेणार आहे, याचाच अर्थ ही असामी कुणीतरी बडी असावी. त्याने जी सुरूवातीला तरुणाला वागणूक दिली होती त्याची लाज आता हवालदाराला वाटत होती. बाहेर जायला तो निमित्त शोधीत होता.

साहेबाचा हुकूम होताच तो तिथून निसटला.

'बोला उदयसिंह चौहान, जे काय घडलं ते आता विसरून जा.'

'काल दुपारी जसवंतसिंगाने कॅप्टनचा धुव्वा उडवला.'

'हो. मी गेला होता पाहणीला. पण काहीच सापडलं नाही. आम्ही सांगायला गेलो असतो तर त्याने मलाच शहाणपणा शिकवला असता. दहा माणसं घेऊन सरळ हल्ला चढवायचा ?'

'साधला असता.'

'कसा ?'

'नीट योजना आखली असती तर. सरळ एकत्र राहून हल्ला झाला रोडेखोरांवर. पण पंचवीस लोकानी त्याला घेरलं. अहो, एकापेक्षा एक नेशाणबाज माणसे आहेत त्यांच्याकडे...तीही गोष्ट लक्षात घ्यायला हवी होती. शिवाय, मिलिटरीत शिक्षण घेतलेली मंडळी आहेत तीं.'

'हो. जयपूर संस्थानातील.'

'त्यांच्यावर चढाई करताना विचार करायला हवा होता. दिवसा गेले ते. दोघादोघांच्या तुकड्या पाडून गेले असते तर काही बिघडलं नसतं. मी जवळच होतो, पण मला प्राण गमवायचा नव्हता.'

'छान केलंत!'

'उद्या रात्री मला कामगिरीवर निघायचं आहे.'

'कसल्या?'

'जसवंतसिंगच्या मागे.'

'एकट्याने?'

'हो.'

'वेड लागलं की काय? मी. हवी तेवढी माणसं देतो पोलिसखात्यात काम केलेली.'

'नाही. तूर्त मला त्याचा पत्ता काढावा लागेल.'

'का? माहित आहे ना?'

'आहे. पण तो माझ्या सुटकेनंतर फार काळ त्या जागी राहणे शक्य नाही. कुठेतरी पळून जाईल. कारण, मी त्या केनेडीचा साथीदार आहे अशी त्याची समजूत झालेली आहे. माझ्या सुटकेला थोडा उशीर झाला असता तर मी तुमच्यापुढे कधीच आलो नसतो.'

'काही योजना आहे ठरलेली?'

'हो.'

'कोणती?'

'त्याचा पत्ता काढायचा आणि सरळ हल्ला करायचा.'

'तो सापडला नाही तर?'

'सापडेल. तो नक्कीच सापडेल. जाऊन जाऊन जाणार कुठं तो? त्याचे ठरलेले तळ आहेत. ते सोडून तो फारसा कुठं दूर जात नाही.'

इन्स्पेक्टर काहीच बोलला नाही.

'माझी एक कल्पना आहे.'

'सांगा.'

'तो आपल्या गावाच्या जवळपास जाईल.'

'कशावरून ?'

'तो घाबरलेला आहे. त्याला माणसांचीही गरज लागेल. कालच्या धुमश्चक्रीत त्याची बरीच माणसे मेली असावी. शिवाय आठ माणसांचा मी खुर्दा केला.'

'आठ ?'

'हो.' नंतर त्याने घडलेली इत्थंभूत हकिकत त्याला सांगितली. इन्स्पेक्टर कान देऊन ती ऐकत होता.

० ० ०

'भाई, आपल्याला सतत तीन दिवस प्रवास करावा लागेल.' विचारात गढलेला जसवंतसिंग एकाएकी म्हणाला. तो विचारात गढलेला पाहून भाई आपली बंदुक साफ करीत बसला होता. झाल्या घटनेचा सर्व ताण आपल्या मालकानेच डोक्यावर घेतलेला आहे याची संपूर्ण जाणीव त्याला होती.

'तीन दिवस ?' आश्चर्याने मालकाकडे पहात भाई उद्गारला. बंदुक साफ करायचे तो साफ विसरला होता.

'हो तीन दिवस. आपल्याला होशंगाबादला जावं लागेल.'

'का ?'

'माझं गाव आहे ते. होशंगापासून दोन कोसांवर पासवाडा हे माझं गांव. बरेच दिवस आपल्याला शांत रहावं लागेल.'

'का ? मालक आम्ही आहोत ना–'

'हो. तुम्ही मला सतत हवे. पण आज आपली ताकद कमी झालेली आहे. कॅप्टनच्या माणसाने तेरा माणसे उडवली. भोला पांचालने आठ. आणायची कुठून माणसे ? गावात विश्रांती घेता घेता आपल्याला विचार करता येईल. योजना आखता येतील आणि नवीन माणसे तयार करता येतील. आता फक्त आपण अकराजण आहोत. शिवाय, पोलिसांचीही भीति

' सदानंद प्रकाशन ' ची फेब्रुवारी १९७१ ची

— ५ नवी अभिमानास्पद प्रकाशने ! —

अनिल टी. कुलकर्णी यांची सारंग कथा

- अजगराची काठी -

प्रा. शरद दळवी M. A. यांची रणधीर कथा

- पाताळातील सैतान -

श्री. गुरूनाथ नाईक यांची गरूड कथा

- अस्थिपंजर -

श्री. गुरुनाथ नाईक यांची शिलेदार कथा

- पांढरा उंदीर -

श्री. गुरूनाथ नाईक यांची गोलंदाज कथा

- नर्मदेचा गोटा ! -

सर्व कथा २० जानेवारीला प्रकाशित झाल्या !

पृष्ठे १०४, किंमत प्रत्येकी दीड रुपया फक्त. एजंटांना आकर्षक कमिशन. सर्व मालांची संयुक्त वा. वर्गणी रु. साठ फक्त. सर्व माला दरमहा नियमितपणें दहा दिवस अगोदर प्रसिद्ध होतात !

आहेच. भोला पांचाल हुशार आहे. तो पोलिसांचा माणूस असला तर आप-ल्याला कुठूनही शोधून काढू शकेल. '

तो बोलायचा थांबला. एका रात्रीत तो दहा वर्षांनी म्हातारा झाला होता.

'मालक, आपण ठरवाल ते...'

'हो... पण तुम्हीही काहीतरी सुचवा. कदाचित तू सांगशील तेही चांग-लंच ठरेल.'

'तुमच्याच गावाकडे जायचं. भलतीच अनोळखी माणसे भरण्यात अर्थ नाही. केव्हा धोका देतील याचा नेम नाही. उद्या शिरजोर झाली तर आपसात लढाई कशासाठी ? ' भाई बोलला. त्याचा मालकावर पूर्ण विश्वास होता.

'सर्वांना जमवून सांगावं ? ' जसवंतसिंगने विचारले.

'काय गरज ? अहो, अशा प्रसंगात तुम्हालाच डोकं फोडावं लागतं, सर्वजण एव्हाना पडले असतील वाकडेंतिकडे. काळजी आहे कशाची ? येतील नाहीतर जातील निघून. होशंगाबादला पोचेपर्यंत कुणाला पत्ता नाही लावायचा कुठं चाललो यावर ! हो, काय नेम सांगावा कुणाचा कुणी ?'

' केव्हा निघायचं ? '

' म्हणाल तर आताच. '

' मार्ग कसा काढायचा ? शक्यतो सुरक्षित हवा. '

'माझी अशी कल्पना आहे, आपण व्यापारी बनायचे. छत्रपूर, कटनी, मंडला असा प्रवास करायचा आणि तिथून सिंदवाड्याला जाऊन इटार्सीहून मागे फिरायचे. चंबळेच्या भागातून आलो याचा कुणाला वास नाही लावायचा. '

' भाई, तू खरोखर हुशार आहेस. '

' कसचं... कसचं... '

' खरंच हुशार आहेस तू. अरे, असा मार्ग काढलास, स्वप्नातही शंका नाही यायची कुणाला. जा... सर्वांना सांग... सूर्य माथ्यावर येण्यापूर्वीच निघायचं आहे. झटपट दशम्या तयार करायला सांग. '

' पोलिस खूपच शोधाशोध करीत आहेत. '

' चालू दे त्याचे काम. आपण सरळ निघायचं. आले वाटेत तर सरळ सामना द्यायचा. मग आमचं काहीही होवो. ' आवाज चढवून जसवंतसिंग म्हणाला.

जसवंतसिंगच्या मनात आणखी एक शंका होती. भोला पांचाल जर रात्रीच पोलिसांची माणसे घेऊन निघाला तर तो कोणत्याही क्षणी या भागात येईल. तसे झाले तर मात्र बरीच पंचाईत होणार होती.

पण अद्याप तरी तो आला नव्हता. जसवंत सारखा आपल्या लोकाना घाई करीत होता.

सर्वजण निघाले. त्यांचे वेश निरनिराळे होते. जसवंत आणि भाई हे मारवाडी व्यापाऱ्याच्या वेशात होते. तर दोघेजण मुनिमांच्या वेशात. बाकीचे शिपाई बनले होते, हत्यारबंद. पण अंगावरचे कपडे दरोडेखोरीच्या वेळी घालतात तसेच होते.

अतिशय अवघड रस्त्याने जसवंतसिग आणि त्यांची माणसे निघाली. झाशीच्या दिशेने तो मठकडे निघाला. तिथून तो थेट दक्षिणेला छत्रपूरच्या रस्त्याने जाणार होता. आणि जसवंत इतक्या दूर गेला असेल अशी शोध घेणाऱ्याना कल्पना येणेच शक्य नव्हते.

: १ :

卐

उदय चक्रावून गेला होता. डोक्यावर ऊन रणरणत असताना त्याला इन्स्पेक्टरने आणून त्याला हव्या त्या ठिकाणी सोडले होते आणि त्याचा रिकामा घोडा घेऊन ते निघून गेले होते.

–आणि उलट बाजूने वळसा घालून तो जसवंतसिंगाच्या तळावर आला होता. तळ रिकामा. इतक्या लौकर जसवंत आपला तळ सोडून जाईल यावर त्याचा विश्वासच बसला नाही.

नंतर त्याने फारशी शोधाशोध केली नाही. सरळ झाशीचा रस्ता धरला. चालता चालता तो विचार करीत होता, दगडावर त्याने एक चमत्कारिक खूण पाहिली होती. तिचा अर्थ त्याच्या डोक्यात येत नव्हता.

चालता चालताच तो थांबला आणि झटका बसल्यागत मागे फिरला. आजुबाजूला पहात तो जसवंतच्या तळाकडे येत होता हो, कुणीतरी येण्याची शक्यता त्याला वाटत होती. जसवंतने ज्याअर्थी मागे कसलीतरी खूण ठेवलेली आहे त्याअर्थी कुणीतरी निश्चित येणार आहे.

त्याच्या मनाने त्याला लगेच शहाणपणा सुचवला होता. कुणीच येण्याची शक्यता नसती तर मग त्या खुणेला काय महत्व होते ? मुद्दाम जाताना खूण मागे ठेवण्याची तरी काय अवश्यकता होती ?

झुडुपातून तो सरळ कपारीकडे गेला. जसवंत ज्या भागात रहात होता त्यात शिरला आणि सरळ जमिनीवर अंग टाकून दिले. पडल्या पडल्याच

त्याला दूरवरचे दिसत होते. पण आत उजेड कमी असल्यामुळे बाहेरून चट्कन् तो कुणालाही दिसला नसता.

कोण येणार आहे ? तो स्वतःलाच विचारीत होता. त्याच्याच प्रश्नाचे उत्तर तो कसा देईल ? उत्तर देऊ शकला असता तर मग तो प्रश्न तरी कसा उपस्थित झाला असता ?

अंधार पडू लागला तरी कुणी आले नाही.

काळोखात त्याने दशम्या बडवल्या. वर कातडी पिशवीतले पाणी प्याला आणि पुन्हा वाट पहात राहिला.

एकवेळ त्याला वाटायचे, सरळ उठून निघून जावे झाशीला आणि लगेच तो निर्णय घ्यायचा, नाही थांबलेच पाहिजे. टोळीतील कुणीतरी आपल्याला नक्की सापडेल. त्या खुणेचा अर्थ समजेल.

नाही सांगितले तर तो कसा काढायचा हे त्याला मात्र चांगले माहित झाले होते.

वाट पाहण्याची एकाद्याची मर्यादा किती ? वेळेपेक्षा पंधरा मिनिटे जास्त झाली तरी डोके आऊट होणारी माणसे आहेत जगात. थं तर तासतास वाट पाहण्याचा प्रश्न होता.

मध्यरात्र झाली तरी तो वाटच पहात होता.

सशाने टवकारावे तसे त्याने कान टवकारले. दूरवर कुठेतरी घोड्याच्या टापांचे आवाज अस्पष्टसे त्याच्या कानावर येत होते. उगाचच-त्याला वाटले कुणीतरी येत आहे.

फक्त आवाज येत होता. तो जवळ येतो का पलिकडे दूरवर जातो हे तो सांगू शकत नव्हता. आता तो उठून उभा राहिला होता. बाहेर साधारण चांदणे पडले होते, त्या प्रकाशात तो डोळे विस्फारून पहात होता.

कारण, आवाज आत बराच जवळ आला होता. गर्द झाडीमुळे कोण येत आहे हे समजत नव्हते. येणारा तो घोडेस्वार याच तळावर जसवंतला भेटायला येत आहे हे त्याच्या लक्षात यायला उशीर लागला नाही..

आता उदय एका आडोशाला उभा होता. गुहेच्या, दारात घोड्यावरून उतरताना त्याला नीट निरखून पाहता यावे हा त्याचा उद्देश होता.

घोडेस्वार चांदण्यात स्पष्ट दिसला आणि त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. अगदी ओळखीचा माणूस एका दरोडेखोराचा हस्तक असलेला पाहून त्याला बरेच आश्चर्य वाटले होते.

त्याने श्वास रोखला. चमकी घेऊन त्याने एक मशाल पेटवली. तळावर कुणीच नाहीत हे त्याने झाडीतून बाहेर येताक्षणीच ओळखले होते. आता त्याची या भागात कुणीच माणसे नसावीत अशी कल्पना झाली असावी.

मशाल पेटली. मशालीचा उजेड उदयवर पडत नव्हता. आता तो खाली वाकून ती खूण पहात होता. नंतर त्याने दुसरी एक खूण पाहिली. ती मात्र उदयच्या नजरेतून सुटली होती.

नंतर तशीच मशाल घेऊन तो आतल्या भागात गेला. पुढे वाकून तो काय करतो हे उदय नीट पहात होता. तो झाशीचा राहणारा जसवंतसिंगचा खबऱ्या होता.

त्याने एका कोपऱ्यात चाचपडून एक थैली बाहेर काढली. मशालीच्या उजेडात उदयला त्याच्या चेहऱ्यावरचे समाधान स्पष्टपणे दिसत होते. तो थैली उघडून पाहताना पाहिले आणि उदयने डोके आत घेतले.

त्याला अडवायचा नाही. आता उदयने निर्णय घेतला होता. झाशीला गेल्यानंतर शांतपणे एक दिवस विश्रांती घेऊन नंतर त्याच्या मागे लागता येणार होते.

उदयच्या अपेक्षेप्रमाणे तो एकदम बाहेर गेला नाही. बराच वेळ बसून तो विश्रांती घेत होता. जसवंतसिंगने आपल्या खबऱ्यासाठी बरेच काही ठेवले असावे यात संशय नव्हता. कारण थैली पाहून तो अगदी खूष झाला होता. मस्तपैकी गाणे गुणगुणत होता.

मशाल विझली गेली आणि तो घोड्यावर बसून तिथून जाताना उदयने पाहिले आणि सरळ निघून गेला. जाताना आनंदाच्या भरात विझलेली मशाल तो आतच विसरून गेला होता.

टापांचे आवाज ऐकू येईनासे होईपर्यंत उदय शांतपणे उभा होता. नंतर त्याने चमकीने मशाल पेटवली आणि गुहेची तपासणी सुरू केली. प्रत्येक कोपरा खाचा तो आता तपाशीत सुटला होता.

एक खबऱ्या येऊन थैली घेऊन गेला होता. नंतर दुसराहि येण्याची शक्यता होती. आज नाही तर पुढे कधीतरी येणार होता आणि थैली घेऊन जाणार होता. अचानक जागा बदलण्याच्या आपल्या संवयीमुळे त्याने अशी एकादी खास व्यवस्था खबऱ्याना पैसे देण्यासाठी केली असेल हे उदयच्या लक्षात खरे म्हणजे या पूर्वीच यायला हवे होते.

सबंध गुहा पालथी घातल्यानंतर त्याला दोन थैल्या मिळाल्या. दोन्ही कंबरेच्या पट्ट्याला बांधून तो बाहेर आला. आणि मशाल विझवून सरळ झाशीच्या रस्त्याला लागला. पहाटेपर्यंत आणखी कुणी येईल म्हणून वाट पहाण्यात अर्थ नव्हता. दुसरा येईल तो रात्रीच येईल कशावरून ? दिवसाही येण्याची शक्यता होती.

दैव साथ करू लागले की त्याला सीमा नसते म्हणतात. देतानाहि त्याला सीमा नसते आणि घेतानाहि नसते.

आज त्याचेहि दैव जोरावर असावे.

उदयने पहिलीच झुडुपांची जाळी ओलांडली आणि एक घोडेस्वार दौडत येताना त्याला दिसला. झटक्यात तो झाडाच्या सावलीत दडला.

मशाल नेण्यासाठी मघाचा जसवंतचा खबऱ्या तर नसेल आला ?

पण छे...तो दुसराच कुणीतरी होता. भरवेगाने घोडा दौडीत तो सरळ गुहेच्या दारात उतरला. घोड्याला एका झाडाला बांधून तो आत शिरला.

उदय आता हळुहळू गुहेकडे सरकत होता. तो गुहेसमोरच्या झुडुपात पोचला तेव्हा गुहेत मशाल पेटली गेली होती. मघाच्या खबऱ्याप्रमाणेच तोहि आता खुणा निरखून पहात होता.

नंतर त्याने आत जाऊन शोधाशोध करायला सुरवात केली. कितीतरी वेळ तो वेड्यासारखा इकडे तिकडे शोधीत होता. पहाट होण्याची वेळ आली तरी त्याला शुद्ध नव्हती. उदयसुद्धा आता उभा राहून राहून कंटाळला होता. सरळ आत जाण्याचा तो विचार[illegible]त होता.

पहाट झाली तरी तेच चालू. चाल[illegible] काय हे ?

त्याचे उत्तर सोपे होते. तो जे शोध[illegible] होता ते सध्या उदयच्या कंबरेला लटकत होते.

अखेर दिवस उजाडला आणि दडलेला उदय सरळ गुहेच्या तोंडावर उभा राहिला. आत गेलेल्याजवळ हत्यार नाही याची उदयने खात्री केली होती. कारण त्याची बंदूक घोड्याच्या पाठीवर होती.

'बोला महाराज, काय शोधता एवढं ? मदत हवी असेल तर मी जरूर करीन.' कंबरेच्या थैलीवर हात मारीत उदय हसत बोलला आणि रागाच्या भरात त्या माणसाने उदयवर झेप घेतली.

तो धिप्पाड शरीराचा खबऱ्या इतका चपळ असेल याची कल्पना उदयला येणे शक्य नव्हते. आणि असे काही करील असेहि वाटले नव्हते. उदय पूर्ण-पणे बेसावध होता.

त्याने दिलेल्या धडकीने तीन कोलांटया खाऊन तो सरळ घोड्याजवळ जाऊन पडला. पण तसाच उसळी घेऊन उभा राहिला. पोटा–छातीच्या वेदना विसरण्याचा प्रयत्न करीत तो उभा होता.

कोणत्याहि क्षणी उदय पिस्तुलाचा उपयोग करू शकला असता. पण त्याला तो जिवंत हवा होता. ठार करणे सोपे होते, पण अशा परिस्थितीत जिवंत ठेवणे अतिशय अवघड होऊन बसले होते.

कारण, फक्त शक्तीच्या जोरावर त्याच्याशी लढणे बरेच अवघड वाटत होते.

'ती थैली दे.'

'का ?'

'माझी आहे ती. नाहीतर मान मोडून टाकीन.' तो ओरडला आणि उदयवर चाल करून आला.

'तुला थैलीच हवीतर काढून घे. मी आपणहून काही देणार नाही.' उदय शांतपणे म्हणाला.

–आणि रेड्यासारखी त्याने उदयला धडक दिली. अंगावर येणाऱ्या गोळ्या चुकवणारा तो. डोक्याची धडक चुकवणे त्याला पोरखेळाइतके सोपे होते.

तो अचानक बाजूला झाला.

–आणि देवाच्या पायांशी नारळ आपटावा तसा आवाज झाला. त्याचे डोके

उदयच्या मागे असलेल्या झाडाच्या खोडावर आपटले होते आणि विव्हळत तो खाली बसला होता...दोन्ही हातानी डोके दाबून.

दोन हात करावे लागतील म्हणून उदय घाबरला नव्हता. तो अगदी शांत होता. नेहमीप्रमाणेच त्याचे मन अगदी ताळ्यावर होते. हातघाईच्या मारामारीत त्याने फारसा भाग घेतला नव्हता... म्हणून तो मागे रहात होता.

चवताळलेल्या नागासारखा फुत्कार टाकींत तो जाडजूड शरीराचा दरोडेखोर उभा राहिला आणि त्याला यापुढे फारशी संधी दिली तर कदाचित तो आपले हाड मोडेल म्हणून उदयने सरळ आपल्या डोक्याचा आघात त्याच्या पोटात केला आणि लगेच उजव्या हाताचा पंजा मानेत हाणला.

हे दरोडेखोराला अनपेक्षित होते. समोरच्या दुबळ्या शरीराच्या पोरात इतकी ताकद असेल असे त्याला वाटले नव्हते. हा एका थपडेचा नाही, अशी त्याची प्रथम समजूत झाली होती.

आता मात्र तो कळवळला होता. पोटाच्या वेदना आणि वर मानेच्या. त्यातून डोके फुटून त्यातून वाहणारे रक्त थेट मानेवर ओघळत होते. त्याच्याऐवजी दुसरा कुणी लेचापेचा असता तर बेशुद्ध होऊन खाली कोसळला असता.

भयंकर जखमा होऊनही त्याने स्वतःला सावरले होते. समोरच्या बावळट पोऱ्याचा खिमा करण्याची त्याने मनोमन प्रतिज्ञा केली होती. आणि उदयही समजून चुकला होता, पिस्तुल काढल्याशिवाय गत्यंतर नाही.

तरीही तो मनाचीं समजूत घालीत होता. आतातरी गोळी झाडण्यात अर्थ नाही. जे काय करायचे ते हातानी.

ते धूड आता एकेक पाऊल उदयच्या दिशेनं सरकत होते. उदय एकाचजागी उभा होता. आपण घाबरलो तर पराभव निश्चित आहे हे तो जाणून होता. गोळीने... तेही एकाच हे सोपे होते. पण ते करायचे नव्हते ना !

उदयला वाटले तो नेहमींप्रमाणे आपल्या अंगावर झेप घेईल. दोन्ही पाय रुंदावून तो तयारीत उभा राहिला. पण घडले मात्र भलतेच. उदयच्या डाव्या पायावर सणसणीत लाथ बसली. उभ्याउभ्याच तो खाली कोसळला आणि स्वतःला सावरण्यापूर्वीच त्याची मान मजबूत हातात पकडण्यात आली.

क्षणात उदयचा हात खिशावर गेला. हॅट एका बाजूला पडली होती. खिशातील पिस्तुल काढून दोन तीन गोळया झाडाव्या असा त्याने विचार केला होता.

झटका बसल्याप्रमाणे त्याचा हात मागे गेला. नाही, गोळी झाडायची नाही... त्याच्या मनाने बजावले. त्याचा विजय झाला असता तरी तो नैतिक पराभवच होता.

गळयाचा दाब वाढत चालला तसा उदय कासावीस होऊ लागला. कुस्तीचे नियम आयुष्यात त्याने ऐकलेही नव्हते. त्याचा एक गुडघा उदयच्या पोटावर होता.

मनाचा निश्चय झाला आणि जोर करून उदयने सरळ त्याच्या पोटात दोन्ही हात खुपसले. तेवढयाने भागले नाही म्हणून की काय त्याने गुदगुल्या करायला सुरुवात केली.

त्याचा परिणाम मात्र लगेच झाला. काहीच कल्पना नसलेला त्या अवा–ढव्य खबऱ्याने मानेवरची पकड सोडली आणि उदय बाजूला झेपावला. आता परत त्याला भिडण्याचा मूर्खपणा करायचा नाही हे उदयने ठरवले होते.

दोघेही मध्ये चार हातांचे अंतर ठेवून उभे होते. चवताळलेला दरोडेखोर एकेक पाऊल पुढे टाकीत होता. उदयचीही तयारी झाली होती. काहीही करायचे पण अंगाला भिडायचे नाही हा त्याचा निश्चय.

आपल्या आटोक्यात आला असे पहात मागे सरकण्याचे नाटक करीत उदयने उजव्या हाताचा जोरदार ठोसा त्याच्या नाकावर मारला आणि दुसऱ्याच क्षणी त्याने डाव्या हाताचा ठोसा त्याच्या गळयावर घातला.

तो किंचाळला. त्याचे दोन्ही हात जखमी भागाकडे सरकले आणि सर्व शक्ती एकवटून उदयने पुन्हा त्याच्या पोटात डोके खुपसले.

काय बिशाद होती त्या राक्षसाची उभे राहण्याची. पडला. सपशेल पडला आणि पडता पडता आणखी एक ठोसा कानशीलात बसल्यामुळे तो आणखी बेभान झाला.

उदय आपल्या ताकदीवर खूष होता.

खाली पडलेला उठून आणखी मारामारीस तयार होणार नाहीस याची त्याने खात्री केली.

' आता झोप पुरे झाली... उठून बस. ' उदय जोरात म्हणाला आणि कुशीत सणसणीत लाथ घातली.

उदयच्या या कृतीचा परिणाम चांगला झाला. बिचारा कोणत्या जख-मेच्या नांवाने रडावे याचा विचार करीत असतानाच उदयने ते फर्मान सोडले होते.

खडबडून उठला तो. हो... उदयची आणखी एक लाथ खाण्याची त्याची इच्छा नव्हती.

' तू आहेस तरी कोण ?'

' तुझा बाप. आधी माझ्या प्रश्नाचं उत्तर दे. जसवंत कुठं गेलाय ?'

' मला माहित नाही. '

' आहे. सांगितलं नाहीस तर सरळ डोक्यात गोळी घालीन... नाहीतर पोटात. तळमळत पडशील या जागेत. तोंडात पाणी घालायलाही कुणी येणार नाही. '

' खरंच... मला माहित नाही. '

' तुला माहित आहे. त्या खुणेचा अर्थ मलाही समजतो. पण मला तुझ्या तोंडून समजायला हवं. '

' पण तू आहेस कोण ? '

उदयचा आता मात्र स्वत:वरचा ताबा गेला. कारण, एकतर तो जाम थकला होता आणि त्यातून आता रेंगाळणे त्याला परवडणार नव्हते... प्रकृतीही मानवत नव्हते. त्याचा डावा हात विजेच्या वेगाने जाऊन दरोडे-खोराच्या थोबाडीत बसला.

' तुझं नांव काय ?' उदयने पुन्हा विचारले.

' सुदन पांडे. '

' त्या खुणेचा अर्थ काय ?'

' मी उत्तरेकडे जात आहे. '

' पांडे, आता मी सरळ पोटात गोळी घालीन. खरं काय ते सांग. ' पिस्तुल पोटाच्या रोखाने नेत उदय चिडून बोलला आणि घाबरला.

' नको... गोळी घालू नकोस. जसवंतसिंग आपल्या गावाकडे गेलाय. '

'कुठं ?'

'पासवाड्याला.'

'कुठं आहे हे पासवाडा ?'

'होशंगाबादहून दोन कोसांवर. नर्मदा नदीच्या काठी.'

'छान ! तुझं गांव कोणतं ?'

'खेडं आहे लहानसं. पासवाड्याहून कोसावर.'

'नर्मदेच्या काठावर ?'

'हो.'

'तुम्ही नर्मदेचे गोटे तर !'

पांडे काहीच बोलला नाही. आयुष्यात कधी मिळण्याची शक्यता नव्हती इतका भरपूर मारा बसला होता.आणखी मारामारी करायची त्याला इच्छाच होत नव्हती. शिवाय आता उदयने पिस्तुलाची स्पष्ट जाणीव दिली होती.

'पांडे, तुझं काय करू ?'

'मला गोळी घालू नकोस.'

'सोडूही शकत नाही.'

'हवतर मला पोलिसाच्या स्वाधीन कर. खुशाल मी तुरुंगात दिवस काढीन'

'हो. तुमच्या दुसऱ्या खबऱ्याने हे जसवंतला कळवले तर तो गांवातहि राहयचा नाही. ताबडतोब पन्नास कोसावर दूर आपला तळ ठोकील.' उदय शांतपणे म्हणाला.

–आणि त्याला नकळत ते घडले. मनाचा इशारा झाला की शरीर कसे नकळत हालचाल करून जाते याचे ते जिवंत उदाहरण होते.

अनाहूतपणे उदयचे बोट ट्रिगरवर दाबले गेले होते आणि पिस्तुलातून सुटलेली गोळी पांडेच्या हृदयात शिरली होती. कोणतीहि हालचाल न करता तो खाली आपटला होता.

उदयला वाईट वाटले. असे करायला नको होते असे त्याला वाटू लागले.

फारसा विचार न करता त्याने बाहेर ठेवलेल्या पांडेच्या घोड्याचा लगाम

सोडला आणि उडी घेतली. पुढची योजना आखीत तो आता झाशीच्या दिशेने चालला होता.

भरधाव धावणाऱ्या घोड्यावर बसल्यामुळे की काय त्याच्याही डोक्यात वेगवान विचार घोळत होते.

पासवाडा !

जसवंतसिंगच्या आधी तो तेथे पोचू शकत होता. कितीही शूर झाला तरी तो सरळ एका दमात गावात जाण्याचे धैर्य दाखवणार नाही.

इन्स्पेक्टर कौरचे पत्र घेऊन तो जाण्याचा विचार करीत होता. म्हणजे त्याला होशंगाबादच्या पोलिसांची मदत सहजरीत्या मिळवता येणार होती.

: १० :

卐

सावली पायांशी घोटाळत असताना उदयने झाशीच्या पोलिस स्टेशनासमोर घोडा उभा केला. तो कामगिरीवर निघालेला आहे हे इन्स्पेक्टरशिवाय कुणालाहि माहित नव्हते. तो एकटाच उदयला पोचवायला आला होता.

'काय हवालदार, आता तरी आत जाऊ काय?' उदय चेष्टेने म्हणाला. त्याला त्या अगडबंब देहाच्या हवालदाराची गंमत वाटत होती. पण आता त्याचा रुबाब पार खलास झाला होता. नम्रतेने तो उदयकडे पहात होता.

'लाजवता का साहेब गरिबाला ?'

'छे...आधी परवानगी घेतलेली बरी.'

खांद्यावरची बंदुक नीट करीत हवालदार त्याला घेऊन आत गेला.

'चौहान ?' आश्चर्यानं त्याच्याकडे पहात इन्स्पेक्टर म्हणाला, 'उद्या सकाळी मी तुमचं प्रेत आणायला जायचा विचार केला होता.'

'मी अत्यंत महत्वाची बातमी आणलेली आहे. जसवंत पळाला.' उदय बसत बोलला.

'कुठं ?'

'दूर कुठेतरी. त्याचा पत्ता लागणे कठीण आहे.' हवालदाराला बाहेर जाण्याची खूण करीत उदय बोलला आणि नंतर तशीच खूण इन्स्पेक्टरलाहि केली.

'सांगा पाहू काय घडलं ते ?' हवालदाराराच्या बुटांचे आवाज दूर जाताच इन्स्पेक्टर म्हणाला.

उदयने घडलेली सर्व हकिकत काहीहि न वगळता सांगितली. इन्स्पेक्टर आश्चर्याने उदयकडे पहात होता !

'फारच भयंकर !'

'नाही...फारच मजा आली. झाशीलाहि त्याचा एक हस्तक आहे हे समजले ते काय थोडे झाले ?'

'कोण ?'

'सांगतो. त्याला जाऊन घेऊन यावं लागेल. जरा हवालदाराला बोलवता का ?'

'हो–' इन्स्पेक्टर होकारला आणि त्याने खड्या आवाजात हवालदाराला हाक मारली.

काय साहेब ?'

'आतून दार बंद कर–' उदय म्हणाला. आणि हवालदार चमत्कारिक चेहेरा करून त्याच्याकडे पहातच राहिला. लगेच ते वाक्य साहेबाने उच्चारताच त्याने दाराला आतून अडसर घातला.

दार बंद करून हवालदार दूर दाराकडे उभा होता.

'हवालदार, तू काल रात्री कुठं होतास ?' उदय शांतपणे डोळ्याच्या कोपऱ्यातून त्याला नीट निरखून पहात म्हणाला.

'घरी.'

'नक्की ?'

'हो.'

'तुला झोपेत घोड्यावर बसून फेरफटका करायची संवय नाही ना ? हो कारण मी तसे बरेच लोक पाहिले आहेत.'

'नाही साहेब...तसं काही नाही...' हवालदार घाबरून म्हणाला. पण तो सावधगिरीने उदयकडे पहात होता.

'जसवंत दरोडेखोराला तू कधी पाहिलंस ?'

'नाही.'

'त्याच्या गुहेच्या दारात काही खुणा होत्या. त्यांचा अर्थ तू सांगू शकशील का ?'

'नाही...मला समजत नाही साहेब ?'

‘ खुणा पाहिल्यास का ?’

‘ नाही साहेब. ’

‘ रात्री घरी किती वाजता आलास ?’

‘ मी गेलोच नाही तर येणार कुठून ?’

‘ गुहेतून आणलेली पैशांची थैली कुठं आहे ?’

‘ पैशांची ?’

‘ हो...पैशांची..’ उदय तडकला होता.

‘ तुम्ही काहीतरी...’

‘ हवालदार, तुझ्या घरी किती माणसं आहेत ?’ उदय अचानक उभा रहात म्हणाला.

‘ सात. ’

‘ पगार पुरतो. ’

‘ हो. कसाबसा पुरतो. ’

‘ तुला कर्ज आहे ?’

‘ नाही. काटकसरीने तेवढ्यात मिळेल ते खातो; कर्ज करून फेडणार कोण साहेब ?’

‘ तुला जमीन आहे ?’

‘ नाही. ’

‘ घर...’

‘ हो. ’

‘ आतापर्यंत किती पैसे साठवलेस ?’ उदयने प्रश्न विचारला.

‘ काहीच नाही. ’

‘ नीट आठवून उत्तर दे. ’

‘ नाही साहेब, आमच्या सारखे गरीब काय माया साठवणार ? ’ तो खेदाने म्हणाला. त्यावेळी उदयच्या हातात गुहेतून आणलेली पैशांची थैली होती. हवालदार विस्फारित डोळ्यानी थैलीकडे पहात होता.

‘ असा पाहू नकोस. ही तुझ्या घरातून आणली. तुझ्या बायकोने दिली मला ती. फार शोधावं लागलं. ’ उदय ती उडवत म्हणाला.

‘ शक्य नाही साहेब. ’

'मार्च' ७१ ची भव्य प्रकाशने !

सर्व कथा अकल्पनीय !

श्री. गुरुनाथ नाईक

- □ गिधाडाची धाड : शिलेदार कथा
- □ रडणारा वाडा : गरूड कथा
- □ भेडाघाटचे भूत : गोलंदाज कथा

श्री. अनिल टी. कुलकर्णी

- □ सूड ! सूड !! सूड !!! : सारंग कथा

प्रा. शरद दळवी; M. A.

- □ गुप्त खुनी : रणधीर कथा

सर्व कथा २० फेब्रुवारीला प्रकाशित होतील

सदानंद प्रकाशन, पुणे ३०

‘ का ? ’

‘ तिला ती सापडणार नाही. ’ हवालदार अनवधानाने बोलून गेला आणि लगेच त्याला आपली चूक कळून आली. पण ती सुधारणे आता शक्य नव्हते.

‘ हवालदार, तिला शोधायला मी मदत केली. ’

‘ कुठं होती ? ’

‘ ते तुझ्या बायकोला विचार. ’

‘ विचारीन... ही आली कुठून हे विचारीन. ’

‘ रात्री तू घरात नव्हतास हे तिनं मला सांगितलं. ’ आता उदय जरा दूर उभा राहिला होता. इन्स्पेक्टर तर भांबावून दोघांकडे आळीपाळीने पहात होता.

हवालदाराचा चेहेरा भयंकर दिसत होता. त्याने आता बंदुक हातात घेतली होती उदय अतिशय सावध होता. इन्स्पेक्टरचा हात पिस्तुलाकडे चालला होता.

‘ साहेब, पिस्तुलाकडचा हात काढा. नाहीतर ठार करीन मी. ’ हवालदार क्रोधाने ओरडला आणि एका झटक्यात त्याचा हात वर झाला.

‘ हवालदार, तू जसवंतचं काम किती वर्षं करतोस ? ’

‘ तुला काय त्याचं ? ’ हवालदार ओरडला. तो कोणत्याही क्षणी गोळी घालील हे उदयला माहित होते. आधी बंदुक झाडली तर तो इन्स्पेक्टरवर झाडण्याची शक्यता दिसत होती. कारण, त्याच्या कंबरेला पिस्तुल लटकत होते.

‘ हवालदार, सरकार तुम्हाला पैसे देतं. ’

‘ हो. अर्धपोटी राहण्याइतके. ’

‘ म्हणून ही बेइमानी ? ’

‘ हवालदार, बंदुक खाली टाक. ’ उभा रहात इन्स्पेक्टर गरजला आणि बंदुकीची नळी फिरली त्याच्या रोखाने. लागोपाठ दोन आवाज झाले.

उदयने झाडलेली गोळी हवालदाराच्या मनगटात शिरली होती आणि हवालदाराच्या बंदुकीतून सुटलेली गोळी इन्स्पेक्टरच्या डोक्यावरून घोंघावत जाऊन भिंतीत शिरली होती. बंदुक खाली पडली होती.

बाहेरून दारावर धक्के बसत होते.

' कुणीहीं दारावर धक्के मारू नका. ' साहेब गरजले आणि धक्के बंद झाले. उदयने शांतपणे दाराकडे जाऊन दार उघडले. त्याच्या डाव्या हातात पिस्तुल जय्यत तयारीत होते. बाहेरचे सर्वजण उदयकडेच पहात उभे राहिले.

' पाहता काय, हवालदाराला बेड्या घाला–' साहेबानी हुकूम सोडला आणि सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. ते उदयला पकडा म्हणून सांगतील अशी त्यांची कामना झाली होती.

लगेच हवालदाराच्या हातात बेड्या घालण्यात आल्या होत्या. पण नेले नव्हते.

' हवालदार, जसवंत कुठं आहे ? ' उदयने विचारले.

' मला माहित नाही. ' दात ओठ खात तो म्हणाला. त्या पोराने त्याचा सर्वनाश केला होता.

' अजून तरी शहाणा हो हवालदार. '

' का ? '

' निदान शिक्षा तरी कमी होईल. '

' फाशी झाली तरी मला पर्वा नाही. ' तो चिडून ओरडला. हे काय घडते आहे हे बाहेरच्या पोलिसाना समजत नव्हते.

' जा... याला नीट बंदोबस्तात ठेवा. ' उदयने म्हटले आणि साहेबानी सांगताच त्याला नेण्यात आले.

' चौहान, तुम्ही तर कमाल केलीत. अगदी आमच्या अस्तनीतला निखारा काढून दाखवलात आम्हाला ! '

' माझं सुदैव जोराबर आहे. रात्रीच मी याला अडवणार होतो, पण वाटलं हातातला आहे, उगाच शक्ती का वाया घालवा. मला विचार करावा लागला असता... याचं नंतर काय करावं याचा. '

' नाही... केलत ते फार चांगलं केलंत. काय नेम त्याचा. फार भयंकर माणूस आहे तो. मी येताच आधी त्याला दमात घ्यायला सुरुवात केली... एक भयंकर टोळीशी मैत्री ? डोळ्यांवर विश्वास नाही बसत माझ्या. '

' जसवंत कुठं जाईल असं तुम्हाला वाटतं ? '

'होशंगाबादला. मी उद्या सकाळी निघणार आहे. मला एक उत्तम असा घोडा हवा. मी आणलेला घोडा तुम्ही घ्या... त्याबदली मला दुसरा द्या. मी घरी परत जाताना तुमचा घोडा तुम्हाला देईन.'

'ती व्यवस्था होईल. सोबतीला पोलिसखात्यातील चांगली दोन माणसे देणार आहे. तुम्ही होशंगाबादला जाताच ती परत येतील.'

'चालेल.'

'चला तर...'

'कुठं ?'

'घरी... भरपूर विश्रांती घ्या... फार काम करावं लागणार आहे तुम्हाला.

o o o

उदयसिंह चौहान झाशीहून निघाला तो सरळ मजल दर मजल करीत सरळ होशंगाबादला पोचला. त्याच्याबरोबर आलेल्या पोलिसांनी तेथील अधिकाऱ्याना खलिते दिले आणि ते निघून गेले.

त्यांनी खलिते वाचताक्षणीच उदयचा भाव एकदम वाढला. कुणीतरी फार मोठा पाहुणा आलेला आहे अशातऱ्हेने त्याची बडदास्त ठेवण्यात आली.

'जसवंतसिंग दरोडेखोर या भागात आहे अशी तुम्हाला खात्री आहे ?' फौजदाराने त्याला विचारले.

'नाही; तो या भागात नाही...पण कोणत्याही क्षणी येईल. पासवाडा हे त्याचं गांव. आला तर त्याचा मुक्काम त्याच गांवात पडेल. तो वेश पाल-टून राहील.'

'तुम्ही आता त्या भागात जाणार आहात ?'

'हो.'

'किती माणसं हवीत ?'

'एकही नको. गरज लागलीच तर मी ताबडतोब देईन.'

'इतक्या लोकांशी लढायचं म्हणजे गरज लागणारच. हत्यारबंद असणार ते सारे.' फौजदार म्हणाला.

' हो. पण आपल्याला अजून कुठं माहित आहे तो पासवाड्यात आलाय म्हणून. मी टेहळणी करीत राहतो. आला की लगेच समजेल. पोलिस दृष्टीला पडला तर तो पळून जाण्याची शक्यता आहे. '

उदयचे म्हणणे फौजदाराला पटले. न पटून तो कुणाला सांगणार होता ?

आपण कुठे राहणार हे त्याने एका शिपायाला बरोबर नेऊन दाखविले आणि रोज दशम्या मिळायची व्यवस्था झाली. पासवाडा गावाच्या अगदी समोर तो एक उंच टेकडावरील झाडावर मुक्कामाला राहिला. गाव आणि तो यामधून नदी वहात होती... विशाल अशी ती नर्मदा.

तो कंटाळला. आठ दिवस गेले. तरी जसवंतसिंग आला नाही. तो येईल की नाही ही शंका त्याच्या मनात निर्माण झाली. काही झाले तरी त्याला पकडायचे या विचाराने तो आधीच पेटलेला.

एकेक दिवस करून पुढे सरकू लागला आणि मनाला सारखे ताजेतवाने ठेवण्यासाठी धडपडणारा उदय जाम कंटाळला. पंधरा दिवस संपले तरी तो येत नाही याचा अर्थ काय ?

दुसऱ्या भागातही गेला असेल !

हाच विचार त्याला सारखा सतावू लागला. अशीच वाट पहात राहिलो तर सहनशक्ती संपेल आणि रागाच्या भरात आपण उंच झाडावरून उडीही घेऊ असे त्याला वाटले.

सोळावा दिवस संपला... सतरावा उजाडला आणि हवे ते मिळाले. नदीच्या पलिकडे त्याने घोडेस्वारांची हालचाल पाहिली.

त्याचे डोळे तीक्ष्ण होते. जसवंतसिंगला त्याने तावडतोब ओळखले. भाई-लाही ओळखले. नंतर त्याने ते ज्या रानात शिरले तेही पाहिले.

दुपारनंतर दोन घोडेस्वार रानातून बाहेर येऊन सरळ पासवाडा गावाच्या दिशेने जाताना त्याने पाहिले.

' छान ! ' तो उद्गारला.

गावात तो आपल्या लोकाना नेणार नाही हे सिद्ध झाले होते. दोन घोड्यावर त्याने बरेच ओझे लादले होते. आणि दोन घोड्यावर ते बसले होते.

उदयने गोष्ट काढली नाही पोलिसाकडे. तो पोलिस शेतकऱ्याच्या वेशात येत असे

तिसऱ्या दिवशी उदयने पोलिसाला कामगिरी दिली.

' आता मीं होशंगाबादला जातो. मी इथं येईपर्यंत तू रहा. मी रात्र होताच येईन. '

दुपार कलण्यापूर्वीच तो होशंगाबादला गेला आणि फौजदाराला घेऊन आला. चाळीस हत्यारबंद शिपाई त्यांच्या बरोबर होते. पण सर्व सूत्रे उदयच्या हाती होती. तो संथपणाने सर्व हालचाली करीत होता.

हो... घाई केली तर काहीतरी बिघडेल अशी त्याला भीति वाटत होती.

रात्र होताच सर्वांनी जसवंतसिंगच्या माणसांना घेरले... काहीहीं कल्पना न देता. चंबळेच्या खोऱ्यातील पोलिसापेक्षा हे अधिक हुशार वाटले त्याला.

रातोरात सर्वांची उचलबांगडी होशंगाबादच्या तुरुंगात झाली. या कानाचा पत्ता त्या कानाला न लावता. कारण, ही खबर जसवंतसिंगच्या कानावर जाता कामा नये असे त्याना वाटत होते.

आता फक्त दहा पोलिसानी रानात पहारा सुरू केला. गोलाकार असे ते झाडावर बसले होते आणि पहारा करीत होते. आपल्या माणसाना भेटायला जसवंत आल्याशिवाय राहणार नाही असे त्याला वाटत होते

दोघे आले. संध्याकाळ होण्यापूर्वी आले. रानात शिरताना ते अगदी बेसावध होते. कोणतेही हत्यार त्यांच्याजवळ नव्हते.

त्याना आश्चर्याचा बसलेला धक्का ओसरण्यापूर्वीच उदयने त्याना वेढले होते.

० ० ०

डोंबारणीची एक गोष्ट आठवली. एक राजा फिरत असताना एक धष्टपुष्ट शरीराची डोंबारीण त्याच्या नजरेत भरली. राजाच तो. ताबडतोब शिपाई पाठवून त्या तरुणीला त्याने भारी कपड्यानी शृंगारली... पाहाण्यासाठी.

तिला पाहून राजा वेडा झाला. ताबडतोब त्याने तिच्याशी लग्नही करुन टाकले. डोंबारीण वैभव मिळाले म्हणून खूष झाली.

पण दिवसेंदिवस खंगू लागली. राजाची तर अतिशय लाडकी. तिचे खंगणे राजाच्या लक्षात आले. ती नीट जेवत नाही हेही त्यानें पाहिले. राजवैद्याला लगेच पाचारण केले गेले.

राजवैद्य अतिशय हुशार, अर्धा आजार बोलूनच बरा करणार, पारख अगदी अचूक. त्याने राणीला तपासले. ती पंचपक्वान्नांची ताटं का तशीच ठेवते हे इंगित त्याच्या अनुभवी डोळयांनी हेरले.

राजवैद्याने हुकूम केला...गुपचुप दासींना...यापुढे हिला जेवायला शिळे ...उरलेले अन्न द्या...भाकऱ्या वगैरे जे गरीब लोक खातात ते.

झाले. गुपचुप फर्मान सुटले. राणीही खूष झाली. रोज जेवणापूर्वी ती ते अन्न खाण्यापूर्वी 'माई...रोटी वाढा...' असे ओरडून नंतर जेवू लागली. आणि काय ...तिची तब्येत म्हणे मस्त झाली.

आमच्या जसवंतसिंग दरोडेखोराचेही नेमके तेच झाले. काही दिवस दरोडे घालायचे नाहीत असे त्याने खूप निश्चय केले आणि जाता जाता एकेक दरोडा घालीत सुटला. नशीब एवढंच की आपल्या नांवाची त्याने फारशी जाहिरात केली नाही.

पहिला दरोडा घातला त्याने तो टिकमगडला. नंतर धांवत धांवत तो निघाला. दोन दोन दिवस विश्रांत घेत तो आगेकूच करू लागला. नाहीतरी वादळासारखा गावात शिरून काय करणार होता.

नरसिंगनगरच्या पोलिसांशी त्याला पहिला सामना करावा लागला आणि तीन चांगली माणसे त्याने गमावली. त्याचा उजवा हातही जखमी झाला... भाई.

चोप मिळाला की मग शहाणपणा येतो. उशीर झालेल्या या शहाण-पणाला अर्थ काय ? पोलिसाना तर समजले होते जसवंतसिंग दरोडेखोर या भागात उतरलेला आहे.

लोक जसवंतसिंगाचे नाव फक्त ऐकून होते पण तो आपला भाग सोडून इतक्या दूरवर येईल याचा कुणाला विश्वासही वाटला नाही. पण पोलि-साना सत्य माहित होते. एका त्याच्याच जखमी माणसाने मरणापूर्वी आपण कुणाकडे काम करतो हे सांगितले होते.

पंधरा दिवसानी जसवंतसिंगने नर्मदा नदी पार केली. नर्मदेचा गोटा अखेर नर्मदेच्या पाण्यात उतरला. चंबळा आणि सिंद नदीचे पाणी त्याला फारसे पचले नाही. नर्मदेचे पाणी पिऊन पुष्ट होण्याचा तो विचार करीतच गावात शिरला...

...पण त्याने गावात आपली फौज नेली नाही. नदीकाठी एका घनदाट रानात त्यांची व्यवस्था केली. फक्त भाई आणि तो आपल्या गावात शिरला

गाव भोळे. त्याला काय माहित आपल्या कुशीत जन्माला आलेले हे गुणी बाळ दरोडेखोर आहे म्हणून. गावाने भव्य स्वागत केले त्याचे. भाईबंबही आले.

कारण, भरपूर पैसा घेऊन भरजरी कपडयात तो गावी आला होता. फार डोके वापरले होते त्याने...आता ते फायद्यात पडले होते.

गावात येताच त्याने पहिली गोष्ट केली ती संपत्ती वाटपाची. गावातील पोरासोराना एकत्र केले आणि झोकदार शब्दात भाषण ठोकले. गावावर आणि गावातील प्रत्येक माणसावरच्या जिवापाड प्रेमाने पुन्हा गावात आणले हे त्याने सांगितले.

गावातील सर्व मंडळी त्याच्यावर बेहद्द खूष झाली—ती त्याच्या भाषणाने नव्हे..तर नंतर देण्यात आलेल्या संपत्तीने. त्याना बिचाऱ्याना काय माहित की, ही सारी संपत्ती कुणाच्यातरी तळतळाटाची आहे म्हणून. ही त्यांच्या अश्रूंनी भिजलेली आहे म्हणून.

नंतर त्याने शेतकऱ्याच्या वेशात दिवस घालवायला सुरुवात केली. त्याच वेशात तो आपल्या लोकाना एका दिवसाआड भेटायला जाई.

तो दिवस अतिशय भयंकर होता. तो आपल्या माणसाना भेटायला गेला तेव्हा त्या जागी कुणीही दिसले नाही त्याला. कंटाळून गेल्यासारखे वाटले त्याला. हो...सर्व सामान घेऊन ते पळून गेले होते.

जसवंतसिंग हादरला. आपल्यातीलच कुणीतरी त्याना फितवून नेले असण्याचा संभव होता.

भाईचे तर तोंडच बंद झाले होते.

'भाई, कसलाच विचार करू नकोस आपण चांगली माणसं तयार करूया पूर्वीपेक्षा चांगली आणि जर...पुढेमागे केव्हा भेटलींच तर सरळ कापून काढूया. बदमाष...'

जाम चिडला तो.

पण हे कर्म कुणी केले हे त्याच्या डोक्यात शिरेना. बरे नित्याप्रमाणे एकादी खूणही ठेवली नव्हती.

. कितीतरी वेळ तो वेड्यासारखा नदीच्या विशाल पात्राकडे पहात एका शिळेवर बसून होता.

'भाई, हाच आपला पराभव.'

'कसा ?'

'माणसं सोडून गेली पण विसरायला हवा.'

भाई काहीच बोलला नाही.

जेव्हा दोघेही घराकडे...पासवाड्यात जाण्यासाठी निघाले तेव्हा त्यांच्या लक्षात आले...सभोवताली बंदुका सरसावून पोलिस उभे आहेत. विचारांच्या नादात ते केव्हा आले हे त्याला समजलेच नाही.

तो भयंकर चिडला.

'भाई, तुला पोहायला चांगलं येतं ?' तो हळूच म्हणाला, ओठही न हलवता.

'हो.'

'मग...एकदम पाण्यात उड्या मारूया. पाहूया नशिब किती साथ करतं ते.'

—आणि डोळ्यांचे पाते लवते न लवते तोच हे सारे घडले. दोघांनीही एकाच वेळी विशाल पात्रात उड्या घेतल्या.

दोघानीही पाण्यात उड्या घेतल्या तेव्हा उदय थक्क झाला. एवढ्या विशाल पाण्यात उडी घ्यायची म्हणजे त्याला काळीजही सुसरीचे लागेल... घट्ट... कवचाचे.

पण विचार करण्यासारखी ती वेळ नव्हती. स्वतः उदय पट्टीचा पोहणारा होता तरी त्याने उडी मारली नाही.

फक्त एकच गोष्ट केली. डोके वर करून श्वास घेणाऱ्या दोघांच्याही डोक्यात एकेक गोळी झाडली...

सर्व काम संपले... नर्मदेचा गोटा नर्मदेच्या पाण्यात संथपणे वाहू लागला... धडपड न करता...

